# आमोद रत्नावलि

[प्रौढांकरिता]

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं नं. ३५८
५९४८



— दा. वि. जोशी

१८४६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०३२०

मराठी ग्रंथ संग्रहालय
१२५०

९०३२०

वाग्भूषण-भांडार : अलंकार १ ला

दामोदर विनायक जोशी एवैव 'आमोद'

विरचिता

# आमोद-रत्नावलि

सर पहिला

(प्रौढांकरिता)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

: पुस्तक मागविण्याचा व पत्रव्यवहाराचा पत्ता- :

व्हरायटी ट्रेड्स् एजन्सी

पोस्ट बॉक्स नं. ३५९०, गिरगाव, मुंबई

मूल्य २ रुपये

मुद्रक—रघुनाथ अनंत मोरमकर
श्रीलक्ष्मी-नारायण प्रेस, २६४ ठाकुरद्वार, मुंबई २

( सर्व हक्क ग्रंथकर्त्याचे स्वाधीन )

प्रकाशक—प. जो जोशी अँड ब्रदर्स
बुकसेलर्स अँड पब्लिशर्स, झावबाची वाडी, ठाकुरद्वार, मुंबई २

# प्रतिभेच्या प्रकाशांत

म्हणें, " स्वकृतिच्या उणें किमपि एक वर्णी न हो ।
असें तुज कधीं बरें विगतशंक वर्णीन हो ! " ॥
असेचि अशि आवडी, करिसि कां न अत्यादर ? ।
स्वभक्तसुरपादपा ! हरि ! नसेचि सत्या दर ॥ ६१ ॥

—केकावलि

वडिलांच्या प्रोत्साहनानेंच 'नवनीता' दि ग्रंथातील प्राचीन कवींच्या काव्याचें वाचन व पठण निष्ठापूर्वक करण्याची सवय मला लहानपणापासून जडली. त्यांतच मनन व निदिध्यासन यांची भर पडली, आणि प्राचीन कवींचीच काव्यें हीं माझीं स्फूर्तिस्थानें बनलीं ! मग मलाहि नवीन काव्यविषय सूक्ष्म दृष्टीनें निवडून काढण्याची प्रेरणा होऊं लागली आणि हृदयांत प्रस्फुरित झालेले विचार व भावना मूर्तस्वरूपांत प्रकट होण्यासाठीं आवश्यक ती शब्दरचना सुद्धां हळूहळू चांगली जमूं लागली तेव्हांपासून व्यासंग सतत चालू ठेवून मीं निरनिराळ्या विषयांवर अनेक कविता लिहिल्या त्यांतील वेंचक कवितांच **आमोद-रत्नावलि सर पहिला व दुसरा** या दोन्ही स्वतंत्र पुस्तकांत ग्रथित केल्या आहेत. सर पहिला हा प्रौढांकरितां असून, सर दुसरा हा मुलांकरितां तयार केला आहे हे दोन्ही सर एकदमच छापून प्रसिद्ध करण्याचा सुयोग प्राप्त झाल्याबद्दल मनाला अतिशय आनंद वाटत आहे आणि इतके दिवस स्फूर्तीच्या तन्मयतेंत स्वच्छंद-पणें घालविलेल्या प्रत्येक घटिकापळाचें सार्थक झालें, असे समाधानाचे निःश्वास सुटत आहेत.

प्राचीन कवींपैकीं कविवर्य मोरोपंत यांच्या काव्याचा मी भोक्ता व भक्तहि आहें, असें सांगण्यास मला निस्सीम अभिमानच वाटतो. साहजिकच ' पुष्पसंगें मातीस वास लागे' या कव्युक्तीप्रमाणें पंतांच्या काव्यांतील अनेकविध गुणसमुच्चया-पैकीं कांहीं गुण, अत्यंत अल्पांशानें कां होईनात, माझ्या काव्यांत दृग्गोचर होणें अपरिहार्य आहे, इतकेंच नव्हे, तर 'आमोद-रत्नावलि'च्या पहिल्या सराच्या आरंभीं व शेवटींहि मीं पंतांच्याच अजरामर काव्यपंक्ति उद्धृत केल्या असून त्यांच्या काव्याशीं असलेला माझा अंतर्बाह्य संबंध अधिक दृढ केला आहे नागपूरचे कवि प्राध्यापक भवानीशंकर श्रीधर पंडित यांच्याकडून माझ्या दोन्ही पुस्तकांना प्रस्तावना लिहून मागण्याचा योगायोगहि सुदैवानेंच प्राप्त झाला. त्याबद्दल प्रा. पंडित यांनीं

आपल्या 'योगायोगां'त उल्लेख केलाच आहे कविवर्य मोरोपंतांच्या काव्याची शलाका-परीक्षा काशीक्षेत्रातल्या पंडितांनीं केली होती; त्याप्रमाणें माझ्याहि काव्याची परीक्षा नागपुरच्या प्राज्ञ 'पंडितां'नीं केली व त्याला यथोचित गौरविलें, याबद्दल मनाला अत्यंत आनंद वाटतो. प्रा पंडित यांचे मी त्याबद्दल मनःपूर्वक आभार मानतों

पहिल्यां सरांतील कविता रचनेच्या कालानुक्रमाऐवजीं शृंगार, वीर, करुण, अद्भुत, हास्य व रौद्र या अमरकोषातील रसांच्या क्रमानें घेऊन, मग स्वाभाविक वर्णन, नमन व अभीष्ट चिंतन या विषयावरील कविता त्यांत समाविष्ट केल्या आहेत त्यामुळें विवक्षित रसाची आवड असलेल्या गुणलुब्ध रसिकाची भायती चांगलीच सोय झाली आहे, यांत शंका नाहीं. अगदीं शेवटीं 'रामदास बोटीची जलसमाधि' ही नुकत्याच घडलेल्या अत्यंत शोचनीय प्रसंगावरील कविता जोडून काव्यविषयाला अद्ययावत्पणा आणला आहे.

काव्य करीत असतांना अभिजात, अभिराम व अभिनव कल्पनांचा मीं सहृदयतेनें प्रसंगानुरूप उपयोग केला असून छंदःशास्त्रांतील नियमान्वयें ऱ्हस्व, दीर्घ, यति याकडे नीट लक्ष देऊन व्याकरणशुद्ध रचना करण्याचा परिपाठ पहिल्यापासून कटाक्षानें पाळला आहे. त्याचबरोबर दोन्ही काव्यग्रंथांचें मुद्रण अत्यंत शुद्ध स्वरूपात, शक्य तितकें निर्दोष करवून घेण्याकडेहि मीं जास्त लक्ष पुरविलें आहे अशा रीतीनें आरंभींच्या श्लोकांत पंतांनीं इच्छिल्याप्रमाणें 'म्हणें स्वकृतिच्या उणें किमपि एक वर्णी न हो' ही माझीहि मनीषा शक्य तों परिपूर्ण करण्याचा मीं पराकाष्ठेचा प्रयत्न केला आहे त्यामुळें माझें काव्य वाचतांना व्युत्पन्न रसिकाला कोठेंहि अडथळा उत्पन्न झाल्यासारखें वाटणार नाहीं अशी माझी खात्री आहे

शेवटीं श्रीसच्चिदानंदाच्या कृपेनें 'आमोद-रत्नावलि'चे दोन्ही सर छापून येण्याच्या परिणतावस्थेपर्यंत ज्यांनीं मजबरोबर सहकार्य केलें त्यांचा नामनिर्देश न करतांच, मनातल्या मनांत त्यांचें कृतज्ञतापूर्वक स्मरण करून, मी त्यांचे आभार मानतों -इति शम् ।

रसिकाचा अभिलाषी

मुंबई, ता २ ऑगस्ट १९४७ — दा वि जोशी एवैव 'आमोद'

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# अर्पण-पत्रिका

( वृत्त-सुमंदारमाला )

जयांनीं जगीं या महद्दैवयोगें, सुकार्यार्थ हा देह मातें दिला।
श्रुती, चर्मचक्षू, तसे ज्ञानचक्षू, जि[1]हीं शक्य तो बोध संपादिला॥
हृदीं प्रस्फुरे स्फूर्ति, जीच्या प्रभावें, जगीं स[2]त्कृती पावती स[3]त्कृती।
म्हणोनी अशा मायबापाविना मी, समर्पूं कुणा ही बरें मत्कृति?॥१॥

—दा. वि. जोशी एवंच 'आमोद'

रचना ता १६-५-१९४५

१ ज्यांनीं, या शब्दाचा संबंध श्रुती (कान), चर्मचक्षू व ज्ञानचक्षू यांकडे आहे
२ सत्कार
३ सुशिक्षित, विद्वान्, ज्ञानी

# योगायोग !

'आमोद-रत्नावली'स मी प्रस्तावना जोडीत आहें, ती केवळ योगायोग म्हणून. योगायोग म्हणण्याचें कारण असें कीं, या कवितासग्रहाचे निर्माते श्री. दामोदर विनायक जोशी–म्हणजे कवि "आमोद" याची व माझी आजपावेतों ओळखदेख फक्त एकदाच काय ती झाली होती. त्यानतर हा कवितासग्रह छापून झाल्यावर त्याचा व माझा पत्रव्यवहार झाला, तोहि फक्त एकदां दोनदांच.

सुमारें दोन अडीच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. श्री जोशी हे आपल्या कामधद्या-निमित्त मुबईहून येथें आले होते एके सकाळीं माझ्या मुक्कामाचा पत्ता काढीत काढीत ते माझ्याकडे आले त्यापूर्वी 'मनोहर'च्या कोणत्याशा अकांत इदूरचे माझे कविमित्र श्री रा. अ. काळेले यानीं माझा परिचयलेख लिहिला होता. त्यात २८ एप्रिल १९०६ या माझ्या जन्मदिनांकाचा निर्देश होता श्री जोशी यांच्या अवलोकनांत तो लेख आला होता. त्याचीहि जन्मतारीख तीच असल्यामुळें माझ्याविषयीं त्यांच्या मनात एक प्रकारची कुतूहलमिश्रित आपुलकी उत्पन्न झाली होती पुन्हा माझ्याप्रमाणें त्यानाहि कवितालेखनाचा नाद असल्यामुळें त्यांच्या सकलित कवितासग्रहास मीं माझे चार शब्द जोडावे अशी त्यानीं इच्छा व्यक्त केली. ती मीं आनदानें मान्य केली. ती मान्य करण्याचें कारण अधिकार किंवा सन्मान नसून आपल्याविषयीं आत्मीयता असणाऱ्या एका अनोळखी कविमित्राच्या नवीन स्नेहसबधास दृढ करावें हा अतःस्थ भाव आहे, हें निराळें सांगावयास का हवें ? परतु हा भाव प्रकट करीत असतांना मला एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे, ती ही कीं, श्री. जोशी यास या कार्यासाठीं माझ्यापेक्षा अधिक निकटचे असे मित्र लाभले असते, तर हें कार्य विशेष उठावदार झालें असतें 'मित्रास पत्र' या कवितेवरून त्यांना तसे मित्र आहेत असें दिसतें त्या मित्रांच्या गोड आठवणी काढण्यांत व त्यांचीं तजेलदार चित्रें रगवण्यांत ते दग होतात. **'मित्रा ! मित्रसुखाविण अन्यसुख जगांत सर्व नाहींच'** असा त्यांचा मित्रत्वासबधीं अभिप्राय आहे, आणि मी जरी दूरस्थ असलों, तरी त्यांचा एक मित्र आहें तेव्हां हें कार्य करण्यांत मी धृष्टता करीत आहें असें मला वाटत नाहीं.

श्री. जोशी हे वृत्तिवत कवि नाहींत ते एक हौशी कवि आहेत कविता-लेखनाचा त्याना शौक आहे. परतु कवितालेखन म्हणजेच सर्वस्व असें मात्र ते समजत नाहींत त्यांच्या कवितांची सख्या अल्प आहे; आणि त्यांतदेखील प्रासगिक कवितांचें प्रमाण विशेष आहे. किंबहुना श्री. जोशी यांस प्रसगोपात्त कविता रचणें विशेष आवडतें असें म्हटल्यास तें चूक होणार नाहीं म्हणूनच

बारसें, मगलागौर, सहकारीदेवी, मौंजीबधन इत्यादि विषय त्यांनीं कवितेसाठीं निवडले आहेत.

श्री. जोशी यांनीं जुन्याबरोबर नव्या काव्याचाहि आस्वाद घेतला आहे. जुन्या कवींपैकीं कविवर्य मोरोपंताच्या कवितेवर त्यांचा विशेष भर आहे. 'पतां-' वर त्यानीं एक 'प्रशस्ति'हि लिहिली आहे. त्याच्या 'पितृनिधनीं' या काव्यांतील पृथ्वीवृत्तांतल्या कविता हें पतांच्या पृथ्वी-वृत्तांतील केकावलीचें गुणालकृत असें अनुकरण आहे पतांप्रमाणेंच जोशांनीं रसाबरोबर रीतीला आणि भावाबरोबर अलकाराला यथोचित सन्मानिलें आहे अर्थालकार व शब्दालकार यावर त्यांचें सारखेंच ममत्व आहे. यामुळें त्यांच्या कवितेंत दोन्ही प्रकाराच्या अलकारांची अगदीं रेलचेल आहे.

श्री जोशी याच्या कवितेचें विषयानुरोधानें वर्गीकरण केल्यास प्रेमगीतें, राष्ट्रीयगीतें, वत्सलगीतें, विनोदगीतें, विलापगीतें आणि वर्णनपर गीतें असे वेगवेगळे विभाग पडू शकतात.

श्री जोशी याच्या प्रेमगीतांत कोमलतेच्या जोडीस अवखळपणा आहे. क्वचित् त्यात त्यांच्यांतला 'टीकाकार' जागृत झाला आहे.

> **फुगीर पोलका वरुनि, आंत ' बॉडि ' तंग ती**
> **पटांत झिर्झिरीत दावि रम्य रंग–संगति**
> **दिसे तिथूनि गौरवर्ण अंतरंग मोकळें**
> **प्रियाविना तिचें कुणास अंतरंग हो कळे ?** ( पृष्ठ ३–४ )

असें ते जिथें ' आधुनिक तरुणी'च्या बहिरगाचें व अतरगाचें वर्णन करतात, तिथेंच **'अपार चैन केलियाविना न चैन हो पडे'** अशी तिच्या विलासावर टीकाहि करतात

श्री जोशी यांच्या राष्ट्रीय गीतात पूर्वेतिहासाचा अभिमान आहे, देशभक्ताचा गौरव आहे आणि निद्रित देशबांधवाना दिलेली चेतावणी आहे.

परतु प्रेमगीतापेक्षा व राष्ट्रीयगीतापेक्षा त्याचीं वत्सलगीतें व विनोदगीतें विशेष विलोभनीय आहेत 'वशवेलकलिका' व 'बारशाचा पाळणा' हीं त्याचीं दोन्ही वत्सलगीतें उत्कृष्ट आहेत तीं वाचत असतांना 'वात्सल्य' हा खरोखरच एक स्वतत्र रस आहे हें आपोआप पटतें जोशांनीं लिहिलेल्या शिशुगीतांचा सग्रह **'आमोद-रत्नावलि : सर दुसरा'** या नांवानें स्वतत्र रीतीनें प्रसिद्ध होत आहे त्यांतील 'आधीं पाहुणे, मग मेहुणे,' 'दोन्ही परीक्षा एकदम पास,' 'बाळाचा

दिनक्रम' या कविता त्यांना विनोदप्रचुर वत्सलरस किती सहज साधतो याची साक्ष देण्यास समर्थ आहेत

विनोदगीतांपैकीं 'सरकारी नोकराचा दिनक्रम' व 'मजेदार मंगलाष्टकें' हीं दोन्ही गीतें हास्यरसानें प्लावित झालेलीं आहेत त्यांत व्यंगदर्शन आहे, पण तें कोणाहि विवक्षित व्यक्तीचें नसल्यामुळें सर्वांना सारखेच हसवतें

श्री जोशी यांच्या 'आमचा रामागडी,' 'माझा बोका' व 'अन्नदेवतेस नमन' या वर्णनपर कविताहि सुंदर आहेत.

श्री. जोशी यांच्यापाशीं सर्वस्वीं नवीन अशा कल्पनांचा भरपूर साठा आहे

व्योमशिराहुनि भूपृष्ठावर
सरळ रुळे तव कचसभार
वीज त्यातुनी वारंवार
फणी आपली ती फिरवी       ( पृष्ठ २९ )

हें 'प्रतिभारमणी'चें कल्पनाप्रचुर वर्णन जितकें नवीन, तितकेंच रम्य व भव्य नाहीं असें कोण म्हणेल ? भूकंप होऊन कराचीजवळ दोन नवीन बेटें निर्माण झालीं, त्या प्रसंगास उद्देशून जोशांनीं पुढील कल्पना केल्या आहेत त्या जितक्या रमणीय, तितक्याच स्मरणीय आहेत

भूदेवी ही प्रसूत झाली, तिचीं जुळीं–बाळें
समुद्रवलयांकित अवतरलीं सुंदर वेल्हाळें
'बेटें' नसती, 'बेटे' असती हे विक्रमशाली
घेउनि आले स्वतंत्रतेच्या हातांत मशाली       ( पृष्ठ ३३ )

श्री जोशी यांच्या कवितांत भावगीतात्मक रचनेचा आढळ फारसा होत नाहीं पण दिवंगत जननीजनकांवरील त्यांच्या विलापिका, 'मृत्यूस आवाहन,' 'निराधार' आणि 'आहे दुजा कोण हा ?' हीं काव्यें व्यक्तिनिष्ठ असल्यामुळें भावगीतांच्या पोटीं येतात यांपैकीं आईवडिलांवरील त्यांच्या विलापिका किंचित् लांबल्या आहेत हें खरें आहे, परंतु त्यांत जीवाला झोंबणारा जिव्हाळा असल्यामुळें ती लांबण जाणवत नाहीं. हें कबूल केलें पाहिजे. त्यांनीं केलेल्या 'मृत्यूस आवाहन' या मृत्युविषयक गीतांत मननशीलता भरपूर आहे या कवितासंग्रहांतील 'आहे दुजा कोण हा ?' हें सुनीत रचनादृष्ट्या अतिशय आकर्षक उतरलें आहे. पूर्वपश्चिमेस रंगवणारा, इंद्रधनुष्यास चितारणारा, वृक्षांना गारीगार करणारा, रात्रीं तारांचे दीप उजळणारा असा हा कोण असावा बरें, असा शंकाकुल तरंग कवीच्या मानसांत उद्भूत होतो,तोंच'सर्व व्यापुनि जो चराचरें असे,हीं तोच कृत्यें करी'

अशी एक शेवटची लाट उसळते आणि कवीच्या शकेचें समाधान होतें. 'निराधारा'ची उभारणी भौतिक आविष्काराच्या आधारावर झाली आहे त्यामुळें त्या कवितेंत नावीन्य निर्माण झालें आहे. कवि परमेश्वरला प्रार्थना करतांना म्हणतो—

नभीं वायुरथ वेगें उडतो
दीपाविणही प्रकाश पडतो
मनुजस्वर यंत्रांतहि दडतो

किंवा

वीजपिशाची जगभर फिरते
बिनतारेवर नर्तन करते (पृष्ठ ३२)

यांच्याप्रमाणें मीहि 'निराधार आधेय फिरे !' तेव्हां तूच मला 'स्वस्थानीं' आण मला तुझाच काय तो आधार आहे या कवितेंत कल्पनेच्या जोडीला भावनेचा उमाळा आहे त्यामुळें कवितेचें एकदर स्वरूप मोठें हृदयंगम झालें आहे.

जोशांची कविता सर्वथैव निर्दोष आहे असें नाहीं. गुलाब कोमल खरा, पण त्याला काटे नाहींत असें कोण म्हणेल ? पण रसिकांनीं त्यांना डावलून फक्त गुलाबाचाच आस्वाद घेणें योग्य ठरेल. जोशांच्या कवितेंत स्वतःच्या प्रतिभेचा दिमाख मिरविण्याची अगर बडेजाव करण्याची वृत्ति दृष्टीस पडत नाहीं. उलट

जरि असतों प्रतिभावान् सत्कवि तरि मारुनी भराऱ्या मी ।
येतों तिकडे, परि मज यावें कोठूनि तें जिणें नामी ? ॥४२॥ (पृष्ठ १७)

असा कोणाहि सत्प्रवृत्ताला साजणारा विनय भरपूर आहे. या प्रवृत्तीला खुलवील असाच त्यांचा 'मनोरथ' आहे. ते म्हणतात—

विजनीं, सुजनीं, वनीं, मनींही
करुनी गुंजन कीं बहुच्च घोष
कविता मम, वा दुजाहि गातां
मज लाभो चिरकाळ आत्मतोष (पृष्ठ ६८)

तो 'मनोरथ' सत्यसंकल्पाचा दाता भगवान् पूर्ण करो, अशी इच्छा प्रकट करून मी ही कांहींशी लांबलेली प्रस्तावना पूर्ण करतों.

श्रीधरसदन, श्रद्धानंदनगर,
अजनी–अंबाझरी रस्ता,
नागपूर–अजनी.
—भवानीशंकर श्री. पंडित

[illegible]

काव्य करावें त्यां, जरि वचकावें दूषितीं परि लघुस ॥
कां न सदन बांधावें कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस ? ॥

—कविवर्य मोरोपंत

इच्छसि मोदं चेत् त्वं रे नर ! 'दामोदरं' भजस्व सदा ।
आद्यन्तविहीनं तं प्राप्स्यसि तत्रैव मोदमनवरतम् ॥

—सुभाषित

# श्रीगणेशवंदन

(वृत्त—शालिनी)

वंदूनी मी प्रार्थितों श्रीगणेशा ।
"मत्काव्याचा हा असे 'श्रीगणेशा' ॥
या मदाला काव्यशक्ती न ठावी ।
यासाठीं मन्मस्तकीं हस्त ठेवीं" ॥ १ ॥

—स्वकृत

१ भावार्थ—मानवा ! तुला निरंतर मोद ( = आनंद ) पाहिजे असल्यास अनाद्यंत अशा दामोदराचें सतत भजन कर कारण 'दामोदर' हा शब्द आद्यक्षर व अन्त्याक्षर यांनीं रहित झाला असतां 'मोद' शिल्लक राहतो.

# अनुक्रमणिका


| क्रमांक | कवितेचें नांव | पृष्ठांक |
|---|---|---|
| १ | प्रीतिचा ठसा | १ |
| २ | दैवी संगम | २ |
| ३ | आधुनिक तरुणी | ३ |
| ४ | संक्रांतीचा हलवा | ७ |
| ५ | दसऱ्याचें सोनें | ८ |
| ६ | तरुणा! ऊठ!! | ९ |
| ७ | माझी तलवार | १० |
| ८ | लो. टिळकांची थोरवी | ११ |
| ९ | कैलासपर्वतावर | १२ |
| १० | कश्चित् कविमित्रास— | १३ |
| ११ | मित्रास पत्र | १४ |
| १२ | माधुकऱ्याचें जिणें | २० |
| १३ | बारशाचा पाळणा | २१ |
| १४ | वशवेलकलिका | २३ |
| १५ | बाळाचें बारसें | २४ |
| १६ | सुखदायी बाळ | २५ |
| १७ | आहे दुजा कोण हा? | २६ |
| १८ | बंगलाऽष्टक | २७ |
| १९ | प्रतिभारमणीस | २९ |
| २० | भूकंप आज का झाला? | ३१ |
| २१ | निराधार | ३२ |
| २२ | भूदेवीचीं जुळीं-बाळें | ३३ |
| २३ | सरकारी नोकराचा दिनक्रम | ३४ |
| २४ | मजेदार मंगलाष्टकें | ३५ |
| २५ | बॅ. दास यांचें स्वर्गारोहण | ३७ |
| २६ | पितृनिधनीं | ३९ |
| २७ | मातृविलापिका | ४४ |
| २८ | मृत्यूस आवाहन | ४७ |
| २९ | सांगली हायस्कुलवर्णन | ४९ |
| ३० | इंग्रजी कवितेचें भाषांतर | ५० |
| ३१ | पाऊस पडतांना पाहून | ५१ |
| ३२ | श्रीसहकारी देवी | ५२ |
| ३३ | दिवाकर-गौरव | ५३ |
| ३४ | अन्नदेवतेस नमन! | ५४ |
| ३५ | श्रीमन्मयूर-प्रशस्ति | ५५ |
| ३६ | दशश्चिंतन | ५६ |
| ३७ | मंगलागौर | ५८ |
| ३८ | मौंजीबंधन | ५९ |
| ३९ | माझा बोका | ६१ |
| ४० | नवरत्नहार | ६३ |
| ४१ | आमचा रामागडी | ६५ |
| ४२ | 'रामदास' बोटीची जलसमाधि | ६६ |
| ४३ | मन्मनोरथमाला | ६८ |
| ४४ | [illegible]मणि | ६९ |

३२०

# प्रीतिचा ठसा

( चाल.—नृपममता रामावरती० )

[एक नवोढा तरुणी आपल्या समवयस्क मैत्रिणीस सांगत आहे —]

खडतर दिन कॉलेजाचे । संपले फार कष्टाचे । एकदां ॥
कळविलें घरीं पत्रानें । ‘ निघतोंच उद्यां गाडीनें । रात्रिच्या ’ ॥
हें कळतां न सुचे कांहीं । मन फार उताविळ होई । भेटण्या ॥
लाजलें, मज हांसलें, जरा थबकलें—
स्वारिला दारिं, स्वारिला दारीं । पाहुनी हर्षलें भारी ॥ अंतरीं ॥ १ ॥
जेवणें झालिं, मग वरती । ‘ गोविंद-विडा ’ प्रिय-हातीं । द्यावया ॥
चाललें करोनी घाई । जरि अधीर धीर न होई । तरि मला ॥
जाउनी उभी दारांत । ओठात हास्य लपवीत । थांबलें ॥
एकान्त, पाहुनी शांत, हळुच ‘ ये आंत ’—
असें मज वदले, असें मज वदले । मग खुदकन् हसुनी गेलें । आंत मी ॥२॥
द्यावया विडा हातांत । लांबविला मीं निज हात । जेधवां ॥
तों विड्यासहित मम हात । प्रेमानें धरिला त्वरित । ओढिला ॥
‘ इश्य, हें काय ? ’ मी वदलें । तशि मला म्हणायच झालं । ‘ये अशी ! ’ ॥
मग हसत, मजकडे बघत, घालुनी हात—
हनुवटीखालिं, हनुवटीखालीं । “प्रीतिचा ठसा” मम गालीं । उठविला ॥३॥

रचना—ता ५-८-१९२८

ग्रंथसंग्रहालय, ठाणे
क्र. ६७४०

# दैवी संगम

[ वृत्त–शार्दूलविक्रीडित : सुनीत ]

एका प्रेमवीराचे उद्गार—

पोवाडे म्हणणार शाहिर कवी जाहीर हें जाहलें ।
गेलों तच्छ्रवणार्थ तैं प्रथम मीं तेथें तुला पाहिलें ॥
दोघांच्या मनिं हेतु एकच कसा आला बरें यास्तव ।
'प्रेमाचा' बनलों तईंच सखये ! 'शाहीर' मी स्वस्तव ॥ १ ॥
सांगे तूं अविवाहिताच हिरवी कंठांतली पोत ती ।
पाहोनी तव पल्लवासम तनू आनंदलों मी अति ॥
पोवाड्यांतिल गूढ अर्थ कळतां माझ्याकडे पाहसी ।
स्वत्प्राप्तीकरितां मलाहि सहसा केलें तयें साहसी ॥ २ ॥
रे[1]–मार्केट, थिएटरें, उपवनें तैशीं सिनेमागृहें ।
सारीं देउळराउळें कितिकदां मीं धुंडिलीं आग्रहें ॥
जातांना मग केधवां तरि तुला विद्यालयीं पाहिन ।
होती आस अशी परंतु ठरले ते सर्वही दुर्दिन ॥ ३ ॥

× × ×

वर्षानें मग गांठतां नच दिसे भाळीं तुझ्या भूषण ।
'दैवी संगम' हा विचित्र म्हणुनी त्याला दिलें दूषण ॥

रचना–ता १४–१२–१९३१

१ पुण्याच्या सुप्रसिद्ध मंडईचें पूर्वीचें नाव

# आधुनिक तरुणी

( या कवितात अनेक तरुणींचें प्रतिबिंब आढळेल )

( वृत्त–पंचचामर )

**तिचे देहालंकार**

सुवर्णचंपकासमान अंगरंग सुंदर।
सुवर्णतुल्य तो सु-वर्ण शोभतो मनोहर ॥
कुरंग कीं विहंग यांपरी तिचेहि ईक्षण।
विलास-लास्य दाविती जनांस हो क्षणक्षण ॥ १ ॥
मुखेंदु–गोल–वर्तुळीं कुरंग–नेत्र लोल ते।
उरोज–गोल हें सरोज–युग्म नित्य डोलतें ॥
कपोल–गोल जेथुनी प्रभा अमोल फांकते।
मनोज्ञ गोल–पातळें नितंबगोल झांकिले ॥ २ ॥
सजीव चित्र काढितो निसर्ग बुद्धिमान् कृती।
तयेंच ही विनिर्मिली मनोभिराम आकृति ॥
सुगात्ररम्यवक्रता[१] तनूस सुष्ठु भासते।
सकच्छ साडि नेसतां तिची प्रभा विकासते ॥ ३ ॥
सगुच्छ वेणि आनितब, "पेन[२]" लाविते उरीं।
करांत "रिस्टवॉच" छान दाखवी बहादुरी ॥
स्वरूपगर्वितेस हा तिचा रुबाब शोभवी।
कलात्म–वेषधारणें समीक्षकां विलोभवी ॥ ४ ॥
कुगीर पोलका वरुनि, आत "बॉडि" तंग ती।
पटांत झिर्झिरीत दावि रम्य रंग संगति ॥

१ मनोहर बाकदार अवयव ( Woman curve ), २ फाउंटन पेन

दिसे तिथूनि गौरवर्ण[1] अंतरंग मोकळें ।
प्रियाविना तिचें कुणास अंतरंग[2] हो कळे ? ॥ ५ ॥

## तिची प्रेमल-ता ( प्रेम-लता )

सलज्जमुग्धभावना हृदीं जयां न मूर्तला ।
सहास्यमंजुभाषणें तयांस देइ पूर्तता ॥
समीप पाहुनी प्रिया प्रमोद-वृत्ति रंगती ।
सलील तुष्टिपुष्टिच्या छटा मुखीं तरंगती ॥ ६ ॥
प्रियस्वभावभावनानुसार वागते मनें ।
बहारदार अर्पिली तिला प्रभाहि यौवनें ॥
कृतींत आत्मभाव, आकृतींत ऐट थाट तो ।
अवर्णनीय हो तरीहि वर्णनीय वाटतो ॥ ७ ॥

## तिची सौंदर्योपासना

शरीरकांतिवृद्धिचीं प्रसाधनें नवींनवीं ।
तिच्या विलुब्ध दृष्टिला सदैव हो हवींहवीं ॥
चिकित्सिकेपरी करी विचक्षणाहि सारखी ।
अचूक मान्यताहि देइ जेविं रत्नपारखी ॥ ८ ॥
सुगंधयुक्त शीततैल केशवर्धनक्षम ।
सुवासपूर्ण आस्यचूर्ण[3], अत्तरेंहि उत्तम ॥
नखाधरांस रंगलेप वापरी चिरंतन ।
" कशी दिसेन अप्सरा " करी असेंचि चिंतन ॥ ९ ॥
गुलाबपुष्पकोमलांगि, चित्तचारु, साजिरीं ।
सुवासनेंहि झुळ्झुळीत रेशमी नि भर्जरी ॥
स्ववेषभूषणार्थ जे सुधारकी इलाज ते ।
प्रयत्नशील होउनी करावया न लाजते ॥ १० ॥

१ आंतलें अंग, २ अंतःकरण, ३ फेसपावडर ( Face Powder )

## तिची विहार-लालसा

फिरावयास मोकळ्या मनें हवेंत मोकळ्या ।
निघे तदा प्रफुल्ल होति चित्तवृत्तिच्या कळ्या ॥
विनोदहास्य-मस्करी सख्यांसवें करी पुरी ।
यथेच्छ सेवि अंतरीं विहारसौख्यमाधुरी ॥ ११ ॥
यदा पथीं रमेगमे प्रियासवेंचि सुंदरी ।
तदा तदीय पुष्ट दंड आपुल्या करीं धरी ॥
सहर्ष चालते, मधेंच सावरीत अंचल ।
अभीष्टसंगतींत होति वासनाहि चंचल ॥ १२ ॥
सुपुष्पवेणि कुंतलीं, करात " बॅग " गुंतली ।
मुखीं प्रसन्नता भली, प्रसाधनेंचि शोभली ॥
मनांत गोड हासली, तदा जनांस भासली ।
सुराप्सराच भूतलीं, नटूनि काय पातली ! ॥ १३ ॥

## तिचें मनोरंजन

न देवदेवळांत ती जशी " सिने-गृहीं " रमे ।
नवीन " शो " तिला सदा पहावया हवा गमे ॥
अपार चैन केलियाविना न चैन हो पडे ।
स्वनेत्रकर्णरंजनेंच तीस शांति सापडे ॥ १४ ॥

## तिची कर्तबगारी

न " चूल-मूल " हेंच कार्य आवडे तिला अतां ।
विभाग बुद्धिनिष्ठ त्यांत दाखवी प्रवीणता ॥
सुशिक्षिता-बलान्विता बनूनि, घेउनी धृति ।
सहर्ष पार पाडिते जबाबदारिच्या कृति ॥ १५ ॥

**तिचें धर्माचरण (?)**

प्रतिष्ठितार्यवर्यपूज्य-धर्मकर्मसंस्कृति ।
महत्त्वहीन मानण्यांत मानितेचि सत्कृति ॥
स्वयें यथेच्छ वर्तनार्थ चित्त ठेवि मोकळें ।
उदात्तधर्मतत्त्व केविं यामुळें तिला कळे ? ॥ १६ ॥

**तिची घोषणा**

स्वधर्मभावनाविहीन कर्ममार्ग आचरी ।
सनातनीत्व सोडुनी सुधारणांस आदरी ॥
म्हणे, " नरांपरी स्त्रियांस हक्क सर्वथा हवा " ।
श्रवूनि हें करील तो प्रजापतीहि वाहवा ! ॥ १७ ॥
नव्या युगीं नवे विचार, तत्प्रचारही नवा ।
समानता-स्वतंत्रता हवी समस्त मानवां ॥
" गुलाम ना स्त्रिया अतां " असें सदैव गाजते ।
प्रबुद्ध भामिनी अशी नव्या युगीं विराजते ॥ १८ ॥

रचना ता २१-११-१९४६

# संक्रांतीचा हलवा

[ चाल–चंद्रकांत० ]

उठा सर्वजन उठा उठा हो, घ्या घ्या हा हलवा ॥
प्रेमें हस्तीं, अप्रतिम असे, प्रीतीचा ठेवा ॥ १ ॥
आकर्षिति हे परस्परांना, प्रेमें ग्रह सारे ॥
चंद्रा पाहुनि सागर–हृदयीं, बहुत प्रेम भरे ॥ २ ॥
महिमा ऐसा प्रेमाचा हा, आहे हो खचित ॥
प्रेमें हलवा सेवन करुनी, चला निघा त्वरित ॥ ३ ॥
मंगल कालीं या एकत्रचि, जमुं या सर्वांनीं ॥
अन्योन्यांतिल भेदभाव परि, सारे विसरोनी ॥ ४ ॥
दक्षिणायनांतुनि चालला, सूर्य उत्तरेस ॥
निद्रालस्य त्यजुनि अनुसरा, त्याच्या मार्गास ॥ ५ ॥
अटकेपावेतोंच उत्तरेकडे मराठ्यांनीं ॥
झेंडे रोवुनि सारी पृथ्वी, टाकिलि दुमदुमुनी ॥ ६ ॥
झटा उत्तरोत्तर स्वदेशाभ्युदयास्तव आतां ॥
सेवन केल्यानें हा होइल चीज असें करतां ॥ ७ ॥

रचना ता. १०–१–१९२६

# दसऱ्याचें सोनें

[ वृत्त—शार्दूलविक्रीडित ]

आलस्यादिक कंटकांनि भरलें मैदान जें मोकळें ।
सीमोल्लंघन सत्वरें तुम्हि करा आधीं तयाचें भलें ॥
कर्तव्यांगण[1] आक्रमूनि विजयी व्हा हो तिथें निर्भर ।
आनंदें विजयाचिया दशमिचें सोनें लुटा नंतर ॥ १ ॥

रचना ता. १६–१०–१९०६

1 कर्तव्याचें रणांगण

# तरुणा ! ऊठ !!

[ चाल—वधूवरांनी भाव धरारे० ]

तरुणा 'ऊठ'। बघ रे ही सरलि पहाट ॥ ध्रु० ॥
अनंत गाणीं ऐश्वर्याचीं
सृष्टिसतीच्या पराक्रमाचीं
उत्साहाचीं, शूरत्वाचीं
सृष्टिचे भाट। गाति हीं ऐक मोकाट ॥ १ ॥
पहा प्रात हा पूर्वदिशेचा
जिथुन चालला नवतेजाचा
चैतन्याचा वीररसाचा
लोटच्या लोट। लुटाया त्यांतला ऊठ ॥ २ ॥
वंशज म्हणविशि मराठियांचा
रणगाजीचा शिवरायाचा
तानाजीचा, बाजीप्रभुचा
तयाची चाड। धरुनियां ऊठ रे ऊठ ॥ ३ ॥
कुठें शूरता ती तव गेली ?
काळझोंप ही कशी लागली ?
ऊठ ऊठ रे ऐशा वेळीं
होइ रे धीट। उत्कर्षमार्ग बघ नीट ॥ ४ ॥
चित्तीं परमेश्वरा स्मरोनी
संघशक्तिनें जन जमवोनी
नैराश्याच्या तिमिरामधुनी
काढिं रे वाट। पाहसी कुणाची वाट ? ॥ ५ ॥

रचना ता. २१–१२–१९२७

प्रसिद्धि:—व्यायाम मासिक मार्च १९३७

# माझी तलवार

( बालराजे श्रीशिवाजीमहाराज याच्या तोंडून खालील
उद्गार निघाले नसतील असें कोण म्हणेल ? )

( चाल–तू टाक चिरुनि ही मान० )

ही पहा माझि तलवार । तीक्ष्ण अनिवार ॥
ही निजतेजें दुष्ट जनाला । करील हो बेजार ॥ ध्रु०
कुंतीसम माता माझी । बहु धन्य
सांगे मज ' तूं रणराजी । हो मान्य '
उपजचि मम चित्तामाजी । चैतन्य
माझी ही तलवार जननिचे । बोल खरे करणार ॥ ध्रु० ॥ १ ॥
दादाजी गुरुजी करिती । उपदेश
द्रोणभीष्म यांसम कथिली । संदेश
' दास्यांतुनि काढीं वरती । हा देश '
या आज्ञेनें देशोद्धरणीं । हीच सदा झटणार ॥ ध्रु० ॥ २ ॥
रामायण सांगे सत्य । रक्षावें
भारत कथि भूदुष्कृत्य । शिक्षावें
निजतेजें रिपुगण नित्य । भक्षावे
यवनासुरमर्दिनी भवानी । अजिंक्य ही ठरणार ॥ ध्रु० ॥ ३ ॥
ही यवनरक्त ईर्षेनें । चाखील
रणदेवीमुख रक्तानें । माखील
सूर्यास आत्मतेजानें । झांकील
स्वधर्म रक्षुनि, राज्य स्थापुनि । दिव्यरूप होणार ॥ ध्रु० ॥ ४ ॥

रचना–ता २८–११–१९३२
प्रसिद्धि–पुरुषार्थ ( शिवाजी खास अंक ) मार्च १९३३

# लो. टिळकांची थोरवी

( वृत्त–शिखरिणी )

स्वयें मोठे गंगाधर–तनय ते बाळ टिळक ।
स्वभालींचा मानी धरणि टिळकांतें सु–टिळक ॥
स्वराज्याचा मंत्र[1] प्रथम टिळकांनीं शिकविला ।
स्वचित्तीं वंदावें म्हणुनि टिळकाला सु–कविला ॥ १ ॥
खरा धीमान् नेता न कुणि टिळकांहूनि दुसरा ।
" डरावें ना कोणा " सुगुण टिळकांचा न विसरा ॥
धरा निष्ठा जैशी अचल टिळकांत व्रतपरा ।
वरा स्वातंत्र्यातें ' टिळक टिळक ' ध्यानचि करा ॥ २ ॥

[ " रामो राजमणि. सदा विजयते" या रामरक्षेंतील श्लोकात आगलेल्या ' राम ' शब्दाच्या सर्व विभक्तिरूपांप्रमाणें वरील कवितात ' टिळक ' हा शब्द सर्व विभक्तींत बसविला आहे ]

रचना ता ५–९–१९४६

१ " स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे "

# कैलासपर्वतावर !

[ चाल–( भूपाळीची ) रक्षरक्ष ईश्वरा० ]

घोर तमीं कां घोरत पडतां भारत जनहो असे ? ।
उठा, पहा हा रवी उगवला प्रभात खुलुनी दिसे ॥
मनु पालटला मनुजगणांला अनुपम सुख द्यावया ।
किती लोटलीं शतकें ऐसा मंगलदिन यावया ॥
हिमालयाची बसली अचला पहा चला स्वारी ।
गगनविहारी शिखरीं जाऊं करुनि वरी स्वारी ॥
कृतनिश्चय हा धृतबुद्धीचा हितसिद्धार्थी गडी ।
भौतिकशास्त्रें–शस्त्रें अपुल्या साह्यासाठीं खडीं ॥
हिंमत धरुनी दमादमानें हिमालयीं जाऊं ।
उच्च स्थानीं उच्च स्वानें स्वातंत्र्या गाऊं ॥
शैलावरती कैलासेश्वर घनचैलाऽऽवर्णी ।
बसला त्याला परवशतेचीं सांगूं गाऱ्हाणीं ॥
मार्गांत बहुपरी विघ्नें जरि येतिल
पर्जन्य–धूम–हिम भीतिद बहु होतिल
कधिं शीतल वारे सारें बळ नेतिल
तरि ' विजयश्री वीरा वरि ' हें तत्त्व मनीं बागवूं ॥
भारतभूच्या पराक्रमाची ज्योत जगीं जागवूं ॥ १ ॥

रचना—ता ३–१०–१९३४
प्रसिद्धि–महाराष्ट्र–शारदा ऑक्टोबर १९३५

# कश्चित् कविमित्रास—

[ वृत्त—शार्दूलविक्रीडित ]

आहें मी तुज पत्र पाठवित हें फारां दिसानंतर ।
यासाठीं समजूं नकोस पडलें प्रेमामधें अंतर ॥
माझ्या या हृदयीं मनोहर तुझी मूर्ती सदाची वसे ।
तूं तें विसरलों असें मग सख्या ' होईल बा, रे, कसें ? ॥ १ ॥

रचना ता. १० ऑगस्ट १९२७

# मित्रास पत्र

[ वृत्त—गीति ]

सप्रेम नमस्कारचि विनंति ही कीं विशेष मम तुजला ॥
क्षेमसमाचाराचें सत्वर बा ! पत्र पाठवीं मजला ॥ १ ॥
बहु दिवसांत सख्या ! कां पत्र तुझें एकही न मज आलें ? ॥
याचें कारण न कळे म्हणुनी मम हृदय बावरें झालें ॥ २ ॥

संशयरत्नमाला

कीं कांहीं सांसारिक विपत्तिनें जाहला तुला त्रास ॥
यास्तव मुळिंहि सुचेना धाडाया एक पत्र मित्रास ॥ ३ ॥
कीं तूं सांपडलासी दावाग्नीमाजि हरिण-सम दुःखीं ॥
तरि तेंहि सांग मज मग आपण दोघेहि होउं समदुःखी ॥ ४ ॥
कीं काहीं तव दैहिक विपत्तिनें प्रीति करपली काय ? ॥
म्हणुनी माझी स्मृतिही तव हृदयातूनि हरपली काय ? ॥ ५ ॥
कीं कोपलास मजवरि मोठा अपराध काय मीं केला ? ॥
तरि कोप किति करावा ? काय न अजुनीहि शांत तो झाला ? ॥ ६ ॥
कीं त्या कोपाग्नीनें प्रेमांकुर का जळोनियां गेला ? ॥
परि मित्रा ! प्रेमस्मृति टिकते तनुनाश जों नसे झाला ॥ ७ ॥
किंवा तुला न होई मत्स्मृति शंका अशी मला आली ॥
परि जरि मी दूर तरी मत्प्रेम-स्मृतिहि दूर का झाली ? ॥ ८ ॥
कीं तुजला वाटे कीं, " धाडुं नये पत्र मजसि दीनार्ते " ॥
परि " मित्र " मानल्यावर बुध न मनी आणिती दुजें नातें ॥ ९ ॥

कीं त्वत्प्रेमधनाला नेलें बहु दूर दुष्ट वातानें ॥
मम हृदयचातक परी विव्हळतो येथ विरहघातानें ॥ १० ॥
कीं तव हृदयामधला प्रेमाचा गंध सर्वही सरला ॥
परि मम मनोभ्रमर बा ! त्यासाठीं फारफार बावरला ॥ ११ ॥
किंवा विरहग्रीष्में प्रेमझरा सकल आटला काय ? ॥
पत्रहि धाडायाला अयोग्य "हा" म्हणुनि वाटला काय ? ॥ १२ ॥
कीं तव हृदयघनांतिल सरला प्रेमामृतांश वाटतसे ॥
म्हणुनी पत्र न धाडिशि ? शुष्क घनीं काय वीज नाचतसे ! ॥ १३ ॥
कीं "मित्र खरा-खोटा" पहावयासाठिं काय करिसी हें ? ॥
परि तुजला कथितों कीं, मी अंतर्बाह्य सारखा आहें ॥ १४ ॥
कीं सौख्यसागरीं तू अवगाहन करिशि काय आकंठ ? ॥
परि इकडे विरहाच्या दुःखें मम दाटला पहा कंठ ॥ १५ ॥
कीं लाभला तुज दुजा मित्र म्हणुनि का न पुससि तू यातें ? ॥
शुचि गंगोदक सोडुनि कोण प्राशील सिंधुतोयातें ? ॥ १६ ॥
कीं "मित्रत्व तुटावें" ऐसें का घेतलें तव मनानें ? ॥
छे ! छे ! न असें होइल, दुभगतें काय तोय खड्गानें ? ॥ १७ ॥

## चिंताभार असह्य भेटीची आतुरता

यापरि शंकितसें मी कारण न खरें कळे परंतु मला ॥
यास्तव मम जीव सख्या ! हा चिंताभार वाहुनी दमला ॥ १८ ॥
झाली क्षीण तनू ही कारण चिंता प्रतिक्षणीं वाढे ॥
चिंताकृशासि करितिल धन्वंतरिचेहि काय मग काढे ? ॥ १९ ॥
ही चिंता जाळितसे माझा हा देह सतत पावक सा ॥
मम हृदय-कुसुम कोमल धरिल तयाच्यापुढें टिकाव कसा ? ॥ २० ॥
"नि[१]र्जीवास चिता जशि तशि चिंता जाळिते सजीवास" ॥
पटली भर्तृहरीची ही सत्योक्ती मदीय जीवास ॥ २१ ॥

१ सजीवं दहते चिंता, निर्जीवं दहते चिता ॥—भर्तृहरि

त्वत्स्मरण नित्य होई दिनरात्र सुचे न इतर कांहींच ॥
मित्रा ! मित्रसुखाविण अन्य सुख जगांत सर्व नाहींच ॥ २२ ॥
आठवती पूर्वींचे दिन आपण जे सुखात घालविले ॥
परि आतां दुःखतमीं भ्रमतों कीं सौख्यदीप मालवले ॥ २३ ॥
आपण असंख्य गोष्टी प्रतिदिवशीं बोललों जिथें स्थळ तें ॥
पाहुनि आतां माझें हळवें मन फारफार हळहळतें ॥ २४ ॥
तें मधुर बोलणें तव आठवुनी मी तयामधें रमतों ॥
तो मंजुळ नाद तुझा माझ्या कर्णीं अजून घुमघुमतो ॥ २५ ॥
मम चित्त रमविती हीं स्मृतिचित्रें काढितां अनेक जुनीं ॥
दमलों मीच अखेरिस परि सरलीं तीं न सर्वथा अजुनी ॥ २६ ॥
गोड तुझ्या आठवणी आठवुनी वाट मी किती पाहू ? ॥
ये तूंच सख्या ! इकडे क्षणभरहि तिथें भला नको राहूं ॥ २७ ॥
मीं कठिले कसे तरि इतके दिन परि न राहवे आतां ॥
झालों अधीर अगदीं त्वद्दर्शनसुख मला हवें आतां ॥ २८ ॥
' ये ये ये ' प्राणसख्या ! लागलि बा ! मजसि फार उत्कंठा ॥
ये ये आलिंगन दे, मार मिठी घट्ट माझिया कंठा ॥ २९ ॥
' ये ये ये ' म्हणुनि तुझी आळवणी मी करूं किती वेळ ? ॥
कां दूर उगिच राहुनि तेथुन बघतोस कौतुकें खेळ ? ॥ ३० ॥
आपुढती मज येथें विरहाची तीव्रता सहावेना ॥
मज एकट्यास आतां पळभरहि तुझ्याविना रहावेना ॥ ३१ ॥
हा त्वद्वियोग दुःसह छळितो मज नित्य मूर्त अंतक-सा ॥
झालों घायाळ तरी माझा तूं पाहतोसि अंत कसा ? ॥ ३२ ॥
प्रत्येक क्षण युग-सा येथें मजला तुझ्याविना वाटे ॥
हृदयीं विषण्णतेचें हें बघ काहूर माजलें मोठें ॥ ३३ ॥
तुजविण मानितसें हें त्रिभुवनही सर्व शून्यवत् बा ! मी ॥
तुजविण सौख्य न वाटे नदीतटीं, रम्य उपवनीं, धार्मीं ॥ ३४ ॥

भेटायास्तव मजला उगीच संकोच कां बरें धरिसी ? ॥
दर्शन देणार खरें, विलंब मग यावयास कां करिसी ? ॥ ३५ ॥
जों जों विलंब करिसी तों तों मज विरह जाणवे भारी ॥
जरि सत्वर येशिल तरि होइन मी फार फार आभारी ॥ ३६ ॥

## स्मरणमात्रेंच भेटणें भाग !

स्मरतांच ये हरीचा गरुड जसा चक्रही मुकुंदाचें ॥
तूहि तसा ये स्मरतां, भ्रमरातें जेविं पुष्प कुंदाचें ॥ ३७ ॥
मन तुजकडेच धावे इंदुकडे जेविं सिंधुची लहरी ॥
परि हाय ! अभागी मी दुर्विधि माझे प्रयत्न सकल हरी ॥ ३८ ॥
त्या संजयास जैसें मज अंतर्ज्ञान जरि तसें असतें ॥
तरि कुशल तुझें कळतें, मग मन अस्वस्थ जाहलें नसतें ॥ ३९ ॥
जरि दिव्यदृष्टि असती, तरि तुज येथून् पाहिलें असतें ॥
मग येथें मन माझें इतकें दुःखार्त राहिलें नसतें ॥ ४० ॥
जरि पंख मला असते, आलों असतों उडूनि तत्काल ॥
परि हाय ! अभागी मी एकाकी कंठितों असा काल ॥ ४१ ॥
जरि असतों प्रतिभावान् सत्कवि तरि मारुनी भराऱ्या मी ॥
येतों तिकडे, परि मज यावें कोठूनि तें जिणें नामी ? ॥ ४२ ॥
श्रीमत्कविकुल-गुरुनें नियोजिला मेघ दूतकार्याला ॥
मज तेंहि कुठुनि साधे ? जें साधे त्याच सुकवि-वर्याला ॥ ४३ ॥
अंगद-वायुसुतादिक दास मिळालेच रामरायातें ॥
जें अमरांसहि दुर्लभ, येइल का भाग्य पामरा या तें ? ॥ ४४ ॥
सेवक-सा देव कसा पार्थाचे प्रीतिनें धुवी घोडे ! ॥
येइल काय कधीं तरि या तद्भाग्यांतलें मला थोडें ? ॥ ४५ ॥
पुण्यश्लोक नळाला हंस मिळाला स्वदूत-सा जाया ॥
श्रीमत् धर्मेंहि झाला उद्यत देवास दूत योजाया ॥ ४६ ॥

या पुण्यश्लोकांचें येइल सद्भाग्य काय हें मातें ? ॥
खनिज म्हणुनि तोलावें तांब्याशीं शुद्धकाय हेमातें ? ॥ ४७ ॥
मी असमर्थ म्हणुनि तूं करूं नको यावयास अनमान ॥
सोडूनि महत्कार्यें द्यावा मित्रोक्तिलाग सन्मान ॥ ४८ ॥

## मित्रप्रेमाचा महिमा

मित्रा ! मित्रा–सम तूं येउनि मम हृदय–पंकजाला हो ॥
त्वत्प्रेमकरांचा मग लाभेल मला अखंड बा ! लाहो ॥ ४९ ॥
सर्वस्व तूंच माझें, किंबहुना तूं बहिश्चर प्राण ॥
प्राणाविना कुडी मग राहील कशी बरें मनीं आण ॥ ५० ॥
त्वत्सम दुर्लभ दुसरा दिलदार दयाळ दोस्त दुनियेंत ॥
"खरि मित्रता" कधींही नच मित्रा ! मधुर–सें वदुनि येत ॥ ५१ ॥
चंदन[1] शीतल लोकीं, शीतल त्याहूनि चन्द्रमा गणती ॥
चंदन-चंद्रांमध्यें परि शीतल साधुसंगती म्हणती ॥ ५२ ॥
त्यो[2] साधुसगतींत प्राज्ञजनें सात पावलें मात्र ॥
असतां मित्रत्वानें वागाया होय सर्वथा पात्र ॥ ५३ ॥
मित्रत्वाचा महिमा गंभीर अपार होय अर्णव तो ॥
मोठेमोठे दमले मग मज मंदास काय वर्णवतो ? ॥ ५४ ॥
जे कार्यकुशल कार्यें दुष्कर-दुःसाध्य म्हणुनियां थकले ॥
ते तीं मित्रत्वाचें नातें जोडुनि करावया शकले ॥ ५५ ॥
प्रेमाच्या पायावर मैत्री-मंदिर उभारलें आहे ॥
अद्भुत चातुर्यानें त्यानें त्रैलोक्य भारलें बा ! हें ॥ ५६ ॥
प्रेम–सुगंधचि भरला मित्रत्वाच्या विशुद्ध-शा कमलीं ॥
घेतां आकर्षूनी शुद्धात्म्यांचीं मनें तिथें रमलीं ॥ ५७ ॥

१ संस्कृत सुभाषिताचें भाषांतर
२ संत म्हणति, सप्तपदें सहवासें सख्य साधुशीं घडतें ॥ – मोरोपंत
सावित्री–आख्यान

प्रीती म्हणजे प्रीती, उपमा इजला दुजी नसे जगतीं ॥
वात्सल्य हिचें आहे म्हणुनि सुखें सर्व लोक हे जगती ॥ ५८ ॥
प्रीति-सुखांत वसाया तळमळतो एकसारखा जीव ॥
शुष्कतडागीं कैसें जीव धरोनी जगेल राजीव ? ॥ ५९ ॥
प्राणी कोणीहि नसे प्रेमभरा शक्त दूर साराया ॥
त्या प्रेमभरें सजलों तुज ' ये ये ' हीच हाक माराया ॥ ६० ॥

## [1]निदान पत्ररूपें तरी भेट

दे भेट पत्ररूपें तुजला जर वेळ यावया लागे ॥
तक्र-प्राशन करुनी दुग्ध-तृषा भागवावया लागे ॥ ६१ ॥
आज-उद्यां तरि येइल पत्र तुझें प्रतिदिनीं मला भासे ॥
परि फसलों कितिदां मी "आलें तव पत्र" याच आभासें ॥ ६२ ॥
तुलसीपत्र बहुप्रिय भगवान् दामोदरास नित्य जसें ॥
पत्र तुझें प्रिय होतें याही ' दामोदरा 'स सत्य तसें ॥ ६३ ॥
शेवटिं हीच विनंती " कशीतरी शीघ्र भेट मज दे तूं ॥
जीवित-साफल्याचा होइल संपूर्ण इष्ट हा हेतु " ॥ ६४ ॥
याहुनि काय वदूं मी ? आतां पुढतीं न लेखणी चाले ॥
वाटेकडेच डोळे लागति हृदयीं भरोनियां आलें ॥ ६५ ॥

रचना तारीख १७-१२-१९२७

1 समक्ष येऊन अगर पत्ररूपानें

# माधुकऱ्याचें जिणें

[ ‘ अन्नभट ’ या अप्रकाशित विनोदी नाटिकेंतील पद ]

( राग झिंजोटी–ताल धुमाळी )

नको हें शिकणें । जरि जीवित बापुडवाणें ॥ ध्रु० ॥
आईबाबा स्वर्गीं गेले । मला एकटें इथें ठेवलें ॥
येथें माझे हाल चालले । नको हें जगणें, वाटतें बरें तें मरणें ॥ १ ॥
कष्ट सोसुनी विद्या करितों । माधुकरीनें पोट भरीतों ॥
तीहि मिळेना पोटभरी तों । दुःख हें सहणें, सर्वांनीं निष्ठुर वदणें ॥ २ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# बारशाचा पाळणा

( चाल—सुतार उत्तमसा० )

अजि धन्य गडे ! भानहि माझें हरलें ।
आनंदें मन मोहरलें ॥
मम आयुष्यीं प्रथमचि हा दिन आला ।
आशातरु सुफलित झाला ॥
कितिकिति देवा ! होऊं तुझी उतराई ।
दीर्घायु बालका देई ॥ १ ॥
वनदेवींनो ! क्रीडा सोडुनि या या ।
बालाला झोके द्याया ॥
वनविहगांनो ! विसरुनि अपुल्या गाना ।
बाळाला गाणीं गा ना ! ॥
शुभफलदायी तुमचीं आशीर्वचनें ।
वर्षोत यशःश्री-सुमनें ॥ २ ॥
प्रकटतां जशी क्षितिजावरती तारा ।
भूप्रदेश चमके सारा ॥
ही नवबाला पसरो तेज-पसारा ।
सहकुटुंब-सहपरिवारा ॥
बहुसुखकारी दिव्य सुलोचना ठेवा ।
अमुच्याशीं नित्य असावा ॥ ३ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे (ग्रंथक्रमांक)

लावण्य हिला पूर्ण चंद्रमा देवो ।
मृदुलता लतांची येवो ॥
हृदयांत हिच्या प्रेमसुधारस वाहो ।
रसनाग्रीं विद्या राहो ॥
निजकुलकीर्ती दिगंतरीं ही नेवो ।
'धन्यधन्य' म्हणवुनि येवो ॥ ४ ॥

बारसें-दिन ता ॥ ४-५-१९३४
प्रसिद्धि स्त्री मासिक सप्टेंबर १९३४

# वंशवेलकलिका

( चाल--रसने न राघवाच्या०- मोरोपत )

सुखवील सर्व लोकां । ही वंशवेलकलिका ॥ ध्रु० ॥
अजि धन्य जन्म झाला । जन्मास आलि बाला ॥
आयुष्यसिंधुनौका । ही वंशवेलकलिका ॥ १ ॥
जी 'देव-'भक्ति केली । ती मूर्तिमंत ठेली ॥
मुळिंही न यांत शंका । ही वंशवेलकलिका ॥ २॥
'देव'-स्वरूपिणी ही । सामर्थ्य दिव्य देहीं ॥
म्हणुनी सदा विलोका । ही वंशवेलकलिका ॥ ३ ॥
नवनीत-कोमलांगी । सुविलोल-दृक्-कुरंगी ॥
जिंकी मुखें शशांका । ही वंशवेलकलिका ॥ ४ ॥
'तातप्रसूकुलांस । आनंदवीन खास' ॥
पिटते असाच डंका । ही वंशवेलकलिका ॥ ५ ॥
गंगा हिमालयाला । भैमीहि भीमकाला ॥
कीं जानकीहि जनका । ही वंशवेलकलिका ॥ ६ ॥
ताऱ्यांत शुक्रतारा । उजळी प्रदेश सारा ॥
बहु लाजवी अनेकां । ही वंशवेलकलिका ॥ ७ ॥
पावित्र्य-शुभ्रतेची । सच्छील-चारुतेची ॥
सत्कीर्तिची पताका । ही वंशवेलकलिका ॥ ८ ॥

रचना ता॥ २८-४-१९३५
बारसेंदिन ता॥ ५-५-१९३५

# बाळाचें बारसें

( चाल–नृपममता रामावरती० )

शुभमंगल दिन हा आला । आनंद मनाला झाला ॥ आजला ॥
देहद्रुम हर्षें फुलला । किंशुकतरु पाहुनि त्याला ॥ लाजला ॥
आदर्श 'देव'नगरीला । जयनाद अशा समयाला ॥ गाजला ॥
संतोष, भरे निःशेष, 'जनार्दन'–शेष
संभ्रमित झाला, संभ्रमित झाला । भूभारहि हलका गमला ॥ त्याजला ॥
आनंदें बहु दुमदुमली । रोमांचित वसुधा झाली ॥ कां बरें ? ॥
बहु लांवुन येतां दमली । ही आप्तमंडळी जमली ॥ कां बरें ? ॥
रमणींची गर्दी झाली । आकर्षक शोभा आली ॥ कां बरें ? ॥
बहु दिसां, पातला असा, योग दिव्य–सा
बारसें–दिवस, बारसें-दिवस । सर्वत्र दिसे उल्हास ॥ यास्तव ॥ २ ॥
'गोविंद घ्या कुणी' हातीं । 'गोपाळ घ्या' असें वदती ॥ बायका ॥
त्यांची ही मधुरा वाचा । लाजती श्रवुनि देवांच्या ॥ नायिका ॥
कोकिळा सख्यांना कोणी । सांगे 'ही मंजुल वाणी ॥ आयका' ॥
पाळणा, छान देखणा, दिसे साजणा
त्यांत बाळास, त्यात बाळास । ठेविती नाव मग त्यास ॥ लाडकें ॥ ३ ॥

रचना ता ॥ ३०–४–१९३५

# सुखदायी बाळ

( चाल—परवशता पाश दैवें० )

सुखदायी बाळ माझा । आहे गुणी हा किती ॥
हावभाव याचे सगळे । भान हारवीती ॥ ध्रु० ॥
उदितचंद्र बघुनी तारे । मुदितचित्त होती ॥ १ ॥
आप्तवर्ग पाहुनि यातें । तेविं हर्षताती ॥ २ ॥
' साठये '–कुलाची कीर्ती । या ' मुकुंद ' हाती ॥ ३ ॥

रचना १९३८

# आहे दुजा कोण हा ?

( वृत्त–शार्दूलविक्रीडित' सुनीत)

सायंकाळिं मजा पहात नदिच्या होतों तटीं शांतसा ।
मच्चित्तीं उठती विचार–लहरी जैशा जलौघीं तशा ॥
वाटे पश्चिमपूर्वदिक्पट सदा जो रंगवी तो अहा ।
'रंगारी' च सुदिव्य काय ? अथवा आहे दुजा कोण हा ? ॥ १ ॥
आकाशांत मनोज्ञ इंद्रधनुच्या मोठ्या कमानीवरी ।
ठेवी गुंफुनि कोण हा बहुपरी रंगीत पुष्पें तरी ?॥
नानावर्ण धरून तीं विनटती उद्यानभागीं पहा ।
यांना रंगवितो 'चितारि'? अथवा आहे दुजा कोण हा ? ॥ २ ॥
कोणीं हा हिरवाच रंग दिधला वृक्षांस विश्रांतल्या ? ।
देतो जीवन कोण वन्य तरुंना ग्रीष्मामुळें वाळल्या ? ॥
तारादीपक लावुनी झळकवी रात्रीं दिशा या दहा ।
सा कोण 'बलाढ्य वीर'? अथवा आहे दुजा कोण हा ? ॥ ३ ॥

× × ×

झाली तोंच चमत्कृती कुजबुजे झाडींत कोणीतरी ।
'सर्व व्यापुनि जो चराचर असे, हीं तोच कृत्यें करी' ॥

रचना ता॥ ५–७–१९२४

# बंगलाऽष्टक

[ **इष्टप्रद सूचना**—मंगलाष्टक, करुणाष्टक, गप्पाष्टक, हिंगाष्टक किंवा कोळीष्टक इ. पैकीं कशाशींहि या 'बंगलाऽष्टका'चा बादरायणसंबंधहि नाहीं एक उत्कृष्ट बंगला पाहून आकृष्ट झालेल्या मनात प्रविष्ट झालेले उत्प्रेक्षा-अलंकारात्मक विचार या अष्टकात समाविष्ट केले आहेत, एवढेंच स्पष्टपणें सांगावेंसें वाटतें ]

( वृत्त-शार्दूलविक्रीडित )

निर्मी कोण उठावदार कृति ही ऐशापरी चांगली ।
जीयोगें मम लोचनांसह मना ही ओढणी लागली ? ॥
नेत्रांचें फिटलें सुरेख कृति ही पाहोनियां पारणें ।
कोणाची कृति ही ? दुणावलि परी शंका अशा कारणें ॥ १ ॥
ब्रह्मयानें करण्यास सत्कृति अशा ही मूस का ओतली ।
लक्ष्मीची प्रतिमाच अप्रतिम या रूपें अहा पातली ॥
कीं दिव्यप्रतिभाबळें कविवरें चातुर्ययोगें भला ।
शब्दांचा परि 'अर्थ'-पूर्ण रुचिर प्रासाद हा बांधला ॥ २ ॥
किंवा शिल्पकला स्वतां प्रकटली रम्यस्वरूपें अशा ।
आला 'ताजमहाल' रूप धरुनी हें धाकुटें प्रायशा ॥
थोरांचें बहुधा यशोमृत इथें हें गोठलें पातळ ।
किंवा नेसुनि बैसली सु-रमणी ही पांढरें पातळ ॥ ३ ॥
देवींचें अथवा इथें अवतरे प्रासादरूपें हसें ।
किंवा शीतल चंद्रिकाच विधुला सोडूनि आली असे ॥

तेजःपुज नभोंगणा त्यजुनियां तेजस्विनी चांदण्या ।
रूपैक्यें अथवा स्वयें प्रकटल्या भूमीवरी नांदण्या ॥ ४ ॥
किंवा मानवचित्तसिंधुमधल्या लाटा नभोभेदक ।
आल्या एकवटूनि रूप धरुनी ऐसें मनोवेधक ॥
कीं प्रासादमिषें इथें प्रकटल्या आशा-अहंभावना ।
आकांक्षा, बहुभव्य निश्चय, तशा चित्तांतल्या भावना ॥ ५ ॥
किंवा जे रचितात नाटक-कथा-सत्काव्य-कादंबरी ।
त्यांची ती प्रतिभा अशी विनटली जी नाचते अंबरीं ॥
किल्ला विस्तृत जो हवेंत रचिला आलाच तो भूतला ।
पत्यांचा दृढ होउनीच अथवा हा बंगला पातला ॥ ६ ॥
कीं स्वप्नांतिल पातला रुचिर-सा हा राजवाडा स्वतां ।
किंवा हा दुमदार मोहक मनोराज्यातला तत्त्वतां ॥
किंवा मूर्त मनोरथ प्रकटले याच्यामिषें सर्वही ।
छे ! छे ! छे ! न असें असे कृति महा-कारागिराचीच ही ॥ ७ ॥
ओतोनी प्रतिभा जशी टवटवी काव्यांस देतो कवी ।
शिल्पज्ञानहि ओतुनी उभविली ही सृष्टि ज्यानें नवी ॥
हें साधें स्थल शोभवी कुशलता खर्चोनि नानापरी ।
तो शिल्पज्ञहि वंदनार्ह मजला वाटे कवीच्यापरी ॥ ८ ॥

× × ×

पोटीं सेवुनियां सुधा[१] हि वसुधा ही नित्य जो भूपवी ।
आनंदेंच सुधा[२] सुधाकर सदा ज्याच्यावरी वर्षवी ॥
ऐसा सुंदर डौलदार बरवा उत्कृष्ट हा बंगला ।
" यावच्चंद्रदिवाकरौ " कुलजनीं प्रेमें करो मंगला ॥ ॐ ॥

रचना ता॥ ७-१-१९२८

१ चुना, २ अमृत

# प्रतिभा-रमणीस[1] —

[ प्रो फडके यांचें 'प्रतिभासाधन' हें पुस्तक वाचल्यावर स्फुरलेले विचार खालील कवितेंत ग्रथित केले आहेत. ]

( चाल :—मरणांत खरोखर जग जगतें० )

तुज नित्य नवी नवलाइ हवी ॥
तव चंचलता हें जग जगवी ॥ ध्रु० ॥

रूप तुझें अव्याजमनोहर
शोभा त्याची अतीव सुंदर
बघुनि अप्सरा स्तंभित पळभर
त्रैलोक्याला तें भुलवी । तुज नित्य नवी नवलाइ हवी०॥१॥

व्योमशिराहुनि भूपृष्ठावर
सरळ रुळे तव कचसंभार
वीज त्यांतुनी वारंवार
फणी आपली ती फिरवी । तुज नित्य नवी नवलाइ हवी०॥२॥

गोष्टी—नाटक—कादंबरिंचे
पेहराव तव नानापरिचे
चमकतात हे अस्सल जरिचे
तेज तयांचें तुज खुलवी । तुज नित्य नवी नवलाइ हवी०॥३॥

१ आवाहन न जानामि, न जानामि तवार्चन ॥
पूजां चैव न जानामि, क्षम्यता प्रतिभेश्वरि ! ॥

उच्च कल्पना–विलास–वारु
घेउनि चढसी दुर्गम मेरु
तुझा गमनपथ होई चारु
नभीं विहरतां जेविं रवी । तुज नित्य नवी नवलाइ हवी०॥४॥

अवघें स्थिरचर पदार्थजात
यांस दिव्य निज तेज समर्पित
त्रिकाल[1] हिंडसि जगत्रयांत
विहरे नारदमुनि जेवीं । तुज नित्य नवी नवलाइ हवी०॥५॥

रम्य उषा तूं, तुझिया शुद्ध
रंगमहालीं कवि–अनिरुद्ध
होउनि संचरतो अ–निरुद्ध
प्रीति तुझी कविला ठावी । तुज नित्य नवी नवलाइ हवी०॥६॥

रचना ता ॥ १६–९–१९३३
प्रसिद्धि साप्ताहिक त्रिकाळ · १२ फेब्रुवारी १९३४

१ भूत–वर्तमान–भविष्य

# भूकंप आज कां झाला ?

भूकंप आज कां झाला ? । थरकांप होइ चित्ताला ॥ ध्रु० ॥

रघुपतिराघवराजाराम
नळादि राजे सुखविश्राम
सर्व पावले पूर्ण विराम
तो शेष म्हणोनी भ्याला । हालवी काय शीर्षाला ॥ १ ॥
अनंतकोटिब्रह्मांडातें
उत्पत्तिस्थितिविलया नेते
क्षणांत कोपें भस्मचि करिते
ती ईशशक्ति जनतेला । दाखवी काय निजलीला ॥ २ ॥
विशाल आकाशाच्या प्रांतीं
ग्रहगण अगणित गरगर फिरती
त्यांतुनि एकादा भूवरती
काय हो अकस्मात् आला । आश्रयार्थ बिलगायाला ॥ ३ ॥
पापभीरु जन वदती कांहीं
पुण्यात्म्यांची पुण्यदा मही
पापहिमानें गारठली ही
संकोच हिच्या देहाला । हा काय वाटतो गमला ॥ ४ ॥
प्रखर उष्णता उदरीं धरणी
ठेवितसे ही तिचीच करणी
भूमिगर्भशास्त्र्यांची वाणी
तर्किते अशा तर्काला । सत्यार्थ न कोणा कळला ॥ ५ ॥

रचना–ता ॥ २३–७–१९३३ प्रसिद्धि केसरी ता ॥ २६–१–१९३४

[ ही कविता लिहिली व प्रसिद्ध झाली अशा दोन्ही वेळाचे सुमारास भूकंप झाला होता ]

# निराधार !

( जाति—मधुघट )

निराधार आधेय फिरे । नवलांतिल हें नवल खरें ॥ ध्रु० ॥

सर्व चंद्रमा-बालक घेउनि
रवीसभोतीं धांवे धरणी
भ्रमे ग्रहांसह तोही तरणी
कैंचा त्यां आधार बरें ?। निराधार आधेय फिरे ॥ १ ॥

ब्रह्मांडांतिल वस्तु चलाऽचल
'म[1]नो मधुकरो' मकार चचल
पळभर नसती कदापि निश्चल
स्वैर धांवती सदा त्वरें । निराधार आधेय फिरे ॥ २ ॥

नभीं वायु[2]रथ वेगें उडतो
दीपाविणही प्रकाश पडतो
मनुज-स्वर यंत्रांतहि दडतो
चमत्कार भौतिक सारे । निराधार आधेय फिरे ॥ ३ ॥

वीजपिशाची जगभर फिरते
बिनतारेवर नर्तन करते
वृत्त कथाया कर्णीं शिरते
ऐकुनि विस्मय हृदयिं भरे । निराधार आधेय फिरे ॥ ४ ॥

निराधार मी प्रभो ! तुझ्याविण
पतंगापरी करितों भ्रमण
स्वस्थानीं मज खेंचुनि आण
रज्जु तयाचा धरुनि करें । निराधार आधेय फिरे ॥ ५ ॥

रचना ता ॥ २८-१-१९३४

१ मनो मधुकरो मेघो मानिनी मदनो मरुत् ।
मा मदो मर्कटो मत्स्यो मकारा दश चच्चलाः ।

२ विमान

# भूदेवीचीं जुळीं-बाळें

[ ता. २८-११-४५ रोजीं भूकंप होऊन कराचीजवळ दोन नवीन बेटें निर्माण झालीं. त्या प्रसंगाला उद्देशून खालील कविता रचिल्या आहेत ]

एके दिवशीं अकल्पितपणे चमत्कार झाला ॥
कुतूहलात्मक कांहीं मजकुर वाचनांत आला ॥ १ ॥
" भूकंपानें सागर-हृदयीं प्रचंडाग्नि पेटे ॥
आणि कराचीजवळ उगवलीं दोन नवीं बेटें " ॥ २ ॥
निसर्गनिर्मित कृतिचा अद्भुत वाचुनि वृत्तांत ॥
सहज उसळले अमित कल्पना-तरंग चित्तांत ॥ ३ ॥
भूदेवी ही प्रसूत झाली, तिचीं जुळीं-बाळें ॥
समुद्रवलयांकित अवतरलीं सुंदर वेल्हाळें ॥ ४ ॥
'बेटें' नसती, 'बेटे' असती हे विक्रमशाली ॥
घेउनि आले स्वतंत्रतेच्या हातांत मशाली ॥ ५ ॥
या बेट्यांनो ! या बाळांनो ! सुस्वागत तुमचें ॥
स्वातंत्र्यसुधा संतत सेवा, हेंच स्वहिताचें ॥ ६ ॥
सिंहीचे सुत अहांत तुमची मृगेंद्रता सिद्ध ॥
मतंगजांसम आक्रमकांचीं शिरें करा विद्ध ॥ ७ ॥
राम-कृष्ण वा राम-लक्ष्मणा समान रिपुहननीं ॥
निजबल दावा, प्रसन्न तेणें तुमची भूजननी ॥ ८ ॥
निकटस्थित हा ज्येष्ठ सहोदर पहा आर्यदेश ॥
परकीयांनीं जर्जर केला, भोगितसे क्लेश ॥ ९ ॥
त्या आर्यांचें बीज रुजावें तुमच्या भूमींत ॥
परस्परांनीं मग उजळावी स्वतंत्रता-ज्योत ॥ १० ॥

रचना ता. १२-४-४६

---

# सरकारी नोकराचा दिनक्रम

[ छंद—अभंग ]

सकाळीं उठूनी । चहा ऊनऊन ॥ आकंठ पिऊन । तोंड धुणें ॥ १ ॥
सेफ्टी रेझरनें । दाढी ती घोटणें ॥ मिशांनाही तेणें । रजा देणें ॥ २ ॥
नेमियेल्या वेळीं । कचेरींत जाणें ॥ साहेबा भजणें । जीवेंभावें ॥ ३ ॥
साहेब हा त्राता । साहेब हा धाता ॥ इच्छितही देता । कल्पतरु ॥ ४ ॥
साहेबाची आज्ञा । प्रमाण मानणें ॥ चित्त तें ठेवणें । 'पे-डे' वरी ॥ ५ ॥
पगारांत काट । नोकरीला चाट ॥ मिळे तरी बूट । पुसणें त्याचे ॥ ६ ॥
पोटासाठीं करणें । लांगूलचालन ॥ स्वधर्मपालन । विसरलें ॥ ७ ॥
श्रद्धाहीन झाला । कर्ममार्गभ्रष्ट ॥ पोट भरी स्पष्ट । पशूपरी ॥ ८ ॥

रचना ता॥ २३-१-३४
प्रसिद्धि 'पुरुषार्थ' ऑगस्ट १९३५

# मजेदार मंगलाष्टकें

[‘लग्नमंडपात पेंढारी कवींचा सुळसुळाट’ या नावाचा माझा एक विनोदी लेख साप्ता० सकाळ ता. २६–६–३४ च्या अकीं प्रसिद्ध झाला आहे. त्यात खालील मंगलाष्टकें मुद्दाम रचून घातलीं आहेत.]

( वृत्त—शार्दूलविक्रीडित )

**अद्ययावत् उपमालंकारमंडित मंगलाष्टक—**

संसारास कुणी समुद्र म्हणती, मी तों ‘ सिनेमा ’ म्हणें ।
येथें बोलपटांतल्या बहुगुणी ‘ हीरो ’ परी वागणें ॥
आली स्टेजवरी तुझी प्रियतमा जैशी सिनेमा–नटी ।
खा, प्या, चैन करा, तुम्ही उभयतां, विख्यात व्हा भूतटीं ॥ १ ॥

× × ×

**कांहीं वृत्तपत्रांचीं नांवें समाविष्ट केलेलीं मंगलाष्टकें—**

जैसें ‘ केसरि ’–पत्र चालविति ते ‘तात्या करंदीकर’[1] ।
तूं संसार तसाच चालव मुला ! सर्वां प्रमोदी कर ॥
कीर्तिश्री तुमची अखंड विलसो ‘ ज्ञानप्रकाशा ’ परी ।
देशाचें बहुदैन्य बोंचत असो ‘ भा[2]ल्या ’ परी अंतरीं ॥ २ ॥
ससारास ‘ सकाळ ’ च्या परि तुझ्या आरंभ झाला असे ।
लाजें प्रेम तिन्ही–‘ त्रिका[3]ळ ’ तुमच्या चित्तीं वसो नीटसें ॥
उत्साहें ‘ नवशक्ति ’ धारण करा स्वातंत्र्यसपादनीं ।
वागा धीटपणें जगामधिं ‘ नव्या काळा ’ कडे पाहुनी ॥ ३ ॥

× × ×

**शुभप्रसंगीं स्वर्गीय उपमालंकृत मंगलाष्टक !—**

स्वर्गीं लाभतसे निरंतर अशी ‘शांती[4]’ मृताला जशी ।
ती येथें तुज लाभली दिनकरा ! कां रे ! वृथा लाजशी ? ॥

[1] ‘ केसरी ’ चे त्या वेळचे संपादक
[2] पुण्यातील एक जुनें वर्तमानपत्र—भाला
[3] याच ‘त्रिकाळ’चें रूपांतर ‘दैनिक काळ’ नामक वृत्तपत्रात सध्या झालें आहे.
[4] “ ईश्वर मृताचे आत्म्यास शांति देवो !”

आतां यापुढती सदोदित डबल्-कार्डापरी संयुत ।
राहोनी तिजशीं अहर्निश असा अन्योन्यसौख्यीं रत ॥ ४ ॥

× × ×

[ अनेक चुकानीं लडबडलेलें खालील मंगलाष्टक मुद्दाम बनविलें आहे. होतकरू आणि अव्युत्पन्न कवि-कवयित्री यांच्या काव्याचा हा एक नमुना आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं ]

इंदू ! इंदु[1]–उराकडील कुलक[2]–र्ण्यांचें प्रसिद्ध स्थळ ।
वड्लांनीं[3] तव शोधिलें तुजकरी[4]–ता जें दुजा दुर्मिळ ॥
यातायात्[5] करिती तुझे जनक आ[6]–प्पा जी तुझी माउली ।
नात्वंडाकरवीं[7] तिचें सुफळ श्र[8]–द्धेनें तयां दे मुली ! ॥ ५ ॥

१ इदूर—या शब्दाचा इदु+उर असा विग्रह करून कवितेंत बसविला आहे ! वा कवे ! वा कवे ! ! ' अपि माष मष कुर्यात् छन्दोभंग न कारयेत् '

२ कुलकर्ण्यांचें—येथें यतिभंग झाला आहे

३ वडिलानीं—वरसंशोधन करताकरतां वडिलांची कंबर खरोखरीच मोडली कीं काय न कळे ! कविराजानीं मात्र मोडून टाकली आहे खरी !

४ तुजकरिता—येथें यतिभंग झाला आहे शिवाय ' करितां ' यांतील 'री ' वृत्तसुखास्तव दीर्घ केली आहे ! निरंकुशाः कवयः !

५ यातायात—येथें अंत्य 'त' चा पाय मोडून कविता जुळविण्याच्या यातायातीचा अंतच केला आहे म्हणावयाचा !

६ आप्पा—येथें आप्पा या शब्दाचा आ+प्पा असा विग्रह करून यतिभंग झाल्यामुळें बिचारी माउली ' पाजी ' झाली आहे !

७ नातवंडामार्फत—येथें 'त' चा पाय मोडून भावी नातवंड लंगड्या गोपाळकृष्णाच्या अवतार घेऊन येणार आहे असें तर कवीला सुचवावयाचें नाहीं ना ?

८ श्रद्धेनें—येथील यतिभंग तर तिरस्करणीयच आहे. शिवाय मागील 'सुफळ' यांतील 'ळ' पुढें 'श्र' हें संस्कृत जोडाक्षर आल्यामुळें 'ळ' ला गुरुत्व द्यावयास पाहिजे तें देऊन कविता म्हटल्यास कानाला बदसूर लागते. हल्लींच्या कवितेंत हा दोष स्वैरपणें आढळतो व तो टाळण्याचा कोणी यत्किंचितहि प्रयत्न करीत नाहीं जरा विचार केल्यास हा चरण पुढीलप्रमाणें रचता येईल:—
"स्वापत्याकरवीं तिचें फळ तया अत्यादरें दे मुली ! ॥"

# बॅरिस्टर चित्तरंजन दास

## यांचें स्वर्लोकीं प्रयाण

(मालिनी) अहहह ! अजि झालें काय हे सानथोर ।
सकल जन करीती शोकसंराव फार ॥
अखिल नगर शोकाब्धीमधें कां बुडालें ? ।
बहुजनहितकर्ते दासबाबू निमाले ! ॥ १ ॥
दिसति अखिलशाला बंद कां या विशाला ? ।
शिशुगणहि धरीती कां उदासीनतेला ? ॥
बहुविध जनकार्यी स्वास्थ्य कां आजि आलें ? ।
बहुजनहितकर्ते दासबाबू निमाले ! ॥ २ ॥

(शा वि) ज्याच्या बुद्धिगभीरतेसह असे तो तुल्य रत्नाकर ।
जो विद्वान्, धनवान्, महान् गमतसे धैर्यें जसा भूधर ॥
स्वार्थत्याग बघोनि नाहिं उपमा ज्याला दुजी द्यावया ।
तो गेला अजि वंगसिंहचि कसा स्वाराज्य सेवावया ? ॥ ३ ॥

(मंदाक्रांता) हे भू[1]माते ! अजि तुजवरी कोपला काळ गे ! तो ।
यासाठीं गे ! नरवर तुझे तो हिरावून नेतो ॥
प्रेमें अंकीं बसवुनि तयां जोंवरी न्याहळीशी ।
काळें नेकें, म्हणुनि दिससी हाय ! दुःखार्त ऐशी ॥ ४ ॥

१ हिंदमाते !

( मालिनी ) रडुनि रडुनि आतां काय गे उपयोग ? ।
तुजसि नच तयाच्या भेटिचा दैवयोग ॥
कमि करुनि अतां तूं मन्युचा गे उमाळा ।
मनिं बहुजनपाळा आठवीं तू दयाळा ॥ ५ ॥

( गीति ) तत्प्राप्त्यर्थ व्यर्थचि जरि करिशी शोक गे ! भरतमाय ! ॥
स्वस्थानच्युत तारा आकाशपदीं दिसे पुन्हा काय ? ॥ ६ ॥
मोठेमोठे उपजति सुत तव पोटीं त्वदुद्धरणकार्या ॥
परि दुष्ट काळ घेउनि अल्पावधिमाजि जाइ नरवर्या ॥ ७ ॥
तूं सर्वसमृद्धीनें असशी परिपूर्ण परि जसें भासे ॥
बहु जलपूर्ण सरोवर नच दिसतां त्यांत रुचिर तामरसें ॥ ८ ॥
यास्तव परमेशाची करुनि सदा प्रार्थना प्रसन्न कर ॥
वर माग, 'मदुद्धरणचि करोत देवा ! मदीय पुत्रवर' ॥ ९ ॥
त्याच्याच कृपेनें तव सुतरत्नें दिव्यतेज धरितील ॥
विन[1]तेस गरुड,त्यापरि तीं तुजला दास्यमुक्त करितील ॥१०॥

रचना ता ॥ ?

1 विनता–गरुडाच्या आईचें नांव

# पितृनिधनीं

**कै. तीर्थरूप विनायक** (ऊर्फ तात्या) **महादेव जोशी**, पेन्शनर शाळामास्तर

जन्म–बुधवार, पौष शु ८ शके १७८३ ★ मृत्यु–शुक्रवार श्रावण व. १ शके १८६०

( ता ॥ ८ जानेवारी १८६२ ) ( ता ॥ १२ ऑगस्ट १९३८ )

[ वृत्तें– विविध प्रकारचीं ]

मध्याह्नींचा समय न कळे, मध्यरात्रीहि किंवा ।
भासे भस्में भसित नभ हें धूमधूम्रादिकीं वा ॥
साऱ्या वस्तु अमित गमती सुस्थिरा यत्प्रवृत्ति ।
होई ऐशी स्वपितृनिधनीं बावरी चित्तवृत्ति ॥ १ ॥
हा रे काळा ! कठिण-हृदया ! नीचकर्मप्रवीणा ! ।
प्राणिग्रासीं बहु सुख तुला निर्दया ! प्रेमहीना ! ॥
कित्येकांचे बळि पचविले त्वां बलीवर्दमत्ता ! ।
इच्छा नाहीं शमलि अजुनी काय रे दुष्टचित्ता ? ॥ २ ॥

हिंडायातें दूर रानांत जावें ।
झंझावातें तीव्रवेगांत यावें ॥
न्यावी छत्री, त्यापरी तातछत्र ।
त्वां नेलें रे ! जें अम्हांला पवित्र ॥ ३ ॥
होतें ' विनायक ' असें मधुनाम ज्यांना ।
' तात्या ' असें म्हणतसूं अम्हि सर्व त्यांना ॥
मायाळु जे गरिब, वत्सल वत्सलांचे ।
काळा ! तयांस हरिलेंस, मनांत डांचे ॥ ४ ॥
रात्रीं तुवां येउनि गुप्त वेषें ।
नेलेंस त्यां या अतिघोर दोषें ॥

संपादिला रे ! वद काय धर्म ? ।
या नीचकर्मीं तुज काय शर्म ? ।। ५ ।।
तोड अन्य न तुझ्या करणीला ।
नित्य साधिशि अशा सरणीला ।।
लांडगा छळि जसा हरिणीला ।
तेविं तू छळसि या धरणीला ।। ६ ।।

"तात्या ! तात्या ! अहो या" त्यजुनि निजजनां काय तेथें कराल ?।
गेलां कोठें कळेना, जखडुनि पडलां कालपाशीं कराल ? ।।
कोणाच्या अंतरींही किमपिहि नव्हतें कीं तुम्ही अंतराल ।
पाहूं कोठें तुम्हांला ? उकलुनि वरती येउं का अंतराल ? ।। ७ ।।
" हा तात, तात, तात्या, गेलां कोठें ! " असेंचि ओरडतों ।।
नेत्रीं जल आटे तों आठवुनि तुम्हांस सर्वही रडतों ।। ८ ।।
प्रावृट्काळीं प्राय पर्वतसमुदित-महानद्या द्रवती ।।
त्या दु:खाश्रुमिषानें अस्मन्नेत्रांतुनी अतां स्रवती ।। ९ ।।

गेलां कोठें " तात हो तात " माझे ? ।
कां हो आतां हस्तयष्टी न वाजे ? ।।
कर्णीं कोठें पायचाहूल ये ना ।
आवाजाची साद कानीं पडेना ।। १० ।।
गेलां कोठें कीं प्रवासास काय ? ।
छत्री-काठी-वाहणा येथ ! हाय ! ।।
खाण्या[1]चींही नेटिं नाहींत भांडीं ।
वस्त्रांचींही राहिलीं हीं गठोडीं ।। ११ ।।
एकाएकीं टाकुनीया अम्हांला ।
तात्या ! तात्या ! एकटे काय गेलां ? ।।
आम्हीं मागें फार आक्रांत केला ।
शोकाश्रूंनीं न्हाणिलें या धरेला ।। १२ ।।
• " तात्या ! तात्या ! " हाक ऐशी कुणाला ।
मारूं आतां सर्वदा ? तेंच बोला ।।

१ खाण्याचीं भांडीं—फराळाचा डबा इ०

"ओ, ओ," ऐसें कोण हो उत्तरेल ? ।
मद्वाणी ती हाय ! वातीं विरेल ॥ १३ ॥
वृकानें वधावें अरण्यीं मृगाला ।
स्वबाणें जसें पारध्यानें खगाला ॥
तसें दुष्ट काळेंचि साधोनि संधि ।
तुम्हां ओढिलें, तो महाहीन दुर्धी ॥ १४ ॥
येऊं का हो हुडकित तुम्हां आठही या दिशांला ? ।
किंवा येऊं त्वरित वरती फोडुनी मेघमाला ?॥
पाहूं किंवा कवच चिरुनी भूमिचें या विशाळ ?।
हा रे दैवा ! परि तुम्हि मला काय तेथें दिसाल ? ॥ १५ ॥
असाल कोठें कुठल्याहि ठायीं ।
दिसाल आम्हांस कशा उपायीं ॥
उत्कंठुनी चित्त पुढेंच धावे ।
परंतु कोती मति त्यास भोंवे ॥ १६ ॥
आहां कोठें तिथुनि तरिही एक हो पत्र धाडा ।
कामांचा हो जरिहि असला फार मोठा रगाडा ॥
पत्रीं आम्हां सरळ कळवा आपुला स्पष्ट पत्ता ।
भेटी व्हावी त्वरित तुमची भास ही सत्य चित्ता ॥ १७ ॥
तुम्ही परम चांगले बहु दयाळु दाते जसे ।
सदीन सुजनीं तुम्ही द्रवतसां नभीं मेघ-से ॥
मुलांविषयिंही हृदीं तुमचिया दया निर्मल ।
असे गुण तुम्हांपरी इतर वंशजीं दुर्मिळ ॥ १८ ॥
वडील तुमचे सुधी सुकृतशील मोठे भले ।
तुम्हांस सुख द्यावया न बहुकाळ ते लाभले ॥
परतु तुमची महानिपुण चांगली मावली ।
तुम्हांसह अम्हां मिळे सुचिर तत्कृपा-सावली ॥ १९ ॥

सुशिक्षण मिळावया ग्रहदशा तुम्हीं साहिल्या।
कृपा करि सरस्वती[1] म्हणुनि तत्पदीं वाहिल्या ॥
प्रसाद करितां तिनें बहुत होउनीयां कृती।
कुटुंबभर घेतला निजशिरीं खरी सत्कृति ॥ २० ॥

प्रपंच करितां तुम्हीं कितिक संकटें भोगलीं।
तयां ढकलितां दुरी न तुमची मती भागली ॥
सुदूरपथदृष्टि वा समयधीरता–वीरता।
असे गुण किती कथूं ? सततयत्नगंभीरता ॥ २१ ॥

स्वजन्मभर हिंडुनी अमित शिष्य संपादिले।
सुशिक्षण तयां पित्यापरि तुम्हीं ममत्वें दिलें ॥
पटुत्व तुमचें तयां पटुनि तेहि नांवाजती।
विशुद्धतम नाणकें असति तींच ना वाजती ? ॥ २२ ॥

अम्हीहि तुमचीं मुलें सकल, यांस सच्छिक्षण।
दिलें, करुनि संकटीं सतत आमुचें रक्षण ॥
सुनीतिधृतिसत्यता जगतिं हें सुखा साधन।
दिलें तुम्हिं, तयापुढें इतर तुच्छ वाटे धन ॥ २३ ॥

सत्कीर्तिसुगंध उरे, गेला जरि दिव्यकाय, कापूर।
दृढ पेटींतुनि, तैसा तुमचाही दिव्यकायकापूर ॥ २४ ॥
विद्युद्वेगांत धावे, सकलजन सवें घेउनी आगगाडी।
जाई जों ती दिगंतीं, श्रवणिं पडतसे तद्गतीची धडाडी ॥
तैसे गेलांत वेगें, सुकृतिगुणयशोनाद येतात मागें।
यावद्देहांत जीव स्मरणहि तुमचें मानसीं राहि जागें ॥ २५ ॥
" तात्या तात्या तात्या ! " किति तुमचे गोड गोडवे गावे ! ॥
नित्य स्मरणीं यावे, आप्तेष्टांतें यथेष्ट सागावे ॥ २६ ॥

× × ×

[1] विद्यादेवी पक्षीं तुमची मातुःश्री

[1]कुठें वीणावाद्यध्वनि, तरिहि शोकार्णव कुठें ।
कुठें विद्वद्गोष्ठी, वितरति सुरापीरव कुठें ॥
कुठें रम्या रामा, दिसति जरठाही तरि कुठें ।
अशा या संसारीं सुख–असुख वा हा भ्रम उठे ॥ १ ॥

आलाप कोठेंहि, विलाप कोठें ।
विराग कोठें, सुविलास मोठे ॥
जवापरी सौख्य, विशाल दुःख ।
भवीं विधी मारित नित्य डंख ॥ २ ॥

रचना ता॥ २२–८–१९३४

१ मूळ संस्कृत श्लोक–क्वचिद्वीणावाद्य क्वचिदपिच हाहेति रुदितम् ।
क्वचिद्विद्वद्गोष्ठी क्वचिदपि सुरामत्तकलह ॥
क्वचिद्रम्या रामा क्वचिदपि जराजर्जरतनु ।
न जाने ससार॰ किममृतमय किं विषमय ॥

## एक विलक्षण योगायोग

**सप्तसप्ततिमे वर्षे सप्तमे मासि सप्तमी ॥**
**रात्रिर्भीमरथी नाम नराणामतिदुस्तरा ॥**

अर्थ–मनुष्याच्या आयुष्यातील सत्याहत्तराव्या वर्षाच्या सातव्या महिन्यातील सातव्या दिवसाच्या रात्रीला ‘ भीमरथी ’ ही सज्ञा असून ती अतिशय दुस्तर ( निभावण्यास कठिण ) असते

सदर श्लोक आपटेकृत व वैद्यकृत संस्कृत इंग्रजी शब्दकोशात **भीम** या शब्दाचे अर्थ देताना **भीमरथी** या सामासिक शब्दापुढे दिला आहे

वरील श्लोकाची सत्यता आजपर्यंत कितीजणाना पटली असेल तें सागवत नाहीं, पण माझे वडिलाचे मृत्यूचे बाबतींत मात्र ती अगदीं तंतोतंत, किंबहुना त्याहूनही जास्त सूक्ष्मपणें खरी ठरली श्लोकात ‘ सातव्या दिवसाची रात्र ’ एवढेंच म्हटलें आहे, परतु माझे वडिल ३।४ महिने आजारी असताना त्या दुर्दैवी दिवसाचा नेमका ‘ सातवाच प्रहर ’ ( म्हणजे रात्रीचे १२ ते ३ चा समय ) त्याना प्राणघातक ठरला इतकी या श्लोकाची प्रचीति पटलेली पाहून श्लोककर्त्याच्या अचूक भविष्यज्ञानाचें कौतुक वाटतें

# मातृविलापिका

[ मृत्यु—गुरुवार ज्येष्ठ शु॥११ शके १८६७ (ता॥ २१ जून १९४५) ]

(वियोगिनी)[1]

परमप्रियसाध्वि ! माय गे ! । त्यजुनी गेलिस हाय ! हाय ! गे ॥
खरि होतिस वंशदीपिका । विझली, ही रचितों विलापिका ॥ १ ॥

(शालिनी)

आई आई आइ गे आइ आई । पूज्या स्तुत्या जेविं तूं देव[2]—गाई ॥
वात्सल्याची सत्कृपेचीच साई । नेई तूतें काळरूपी कसाई ॥ २ ॥
काळा ! दुष्टा ! नामरूपेंहि काळा । जिव्हा लौल्या, दंतपक्ती कराळा ॥
त्वन्मातेतें काय रे सौख्य देसी ?। मन्मातेतें कां हिरावून नेसी ? ॥३॥

(स्रग्धरा)

आई, गेलीस कोठें ? स्वजन सकलही सत्वरें सोडुनीयां ।
आई, गेलीस कोठें ? स्वरचित-ममता-पाशही तोडुनीयां ॥
आई, गेलीस कोठें ? स्वकृत सुकृतिचे कुंभ येथें भरोनी ।
आई, गेलीस कोठें ? स्वहृदय-सुमना वज्रवत् गे ! करोनी ॥ ४ ॥
दुर्दैवें व्योम फाटे, दिवस असुनिही लोचनीं ध्वांत दाटे ।
वाटेमध्यें सराटे बहुत पसरिले, टोंचती तीक्ष्ण कांटे ॥
काठी नेई विधाता, इतर न गवसे, कांहिं आधार हाता ।
आई ! तूं तेविं जातां, भ्रमण करितसों अंधवत् सर्व आतां ॥ ५ ॥
ठेवोनी कोटरान्तीं निजमृदुलपिलें, पक्षिणी दूर जाते ।
मातेसाठीं तिथें तीं ' चिवचिव ' करिती भेदुनी काळजातें ॥
माते ! जातां तशी तूं ' शिवशिव[3] ' म्हणतों सर्वदा सर्व बाळें ।
काळें केलें सुदैवें, अघटित घडलें, साधली संधि काळें ॥ ६

१ मातृवियोगदुःखाच्या अतिरेकामुळें आरंभीं वियोगिनी वृत्त योजिलें आहे.

२ कामधेनु

३ दुःखोद्गार

(शार्दूलविक्रीडित)

तूं गेलीस अम्हां त्यजूनि सहसा केलेंस या साहसा ।
हा आचार तुझा नसे उचित-सा, आम्हां गमे दा[1]ह-सा ॥
टाकोनी तुज बोललों न कळतां मागें कधीं काय गे ? ।
टाकोनी म्हणुनी अम्हांस सदये ! गेलीस का माय ! गे ? ॥ ७

तूं गेलीस कशी कुठें विधिबळें आम्हां न कांहीं कळे ।
पंचत्वीं तव देह नश्वर मिळे, आत्मा परें[2]शीं जुळे ॥
त्वन्मूर्ती तव सत्कृति-स्मृतिमुळें, चित्तांतुनी ना ढळे ।
पूजावें तिज नित्य लोचनजळें, हा मार्ग गे ! आढळे ॥ ८ ॥

(इंद्रवज्रा)

तूं मा[3]तृदेवाह्वय वंद्य मूर्ति । कर्तृत्व-दातृत्व-कृपत्व-पूर्ति ॥
वात्सल्य माया-गुणपुष्पपुंज । शोभे तयें हा कुलकीर्तिकुंज ॥ ९ ॥
ही जन्म[4]भूमी जशि वंद्य मातें । तूं जन्मदात्री तशि वंद्य[5] माते ! ॥
स्वर्गाहुनी श्रेष्ठ तुम्ही म्हणोनी । सेवीतसें सार्थकता गणोनी ॥ १० ॥

( शिखरिणी )

दिली तातें तूतें शिशुपणिंच अस्मत् शुचिकुलीं ।
सु-लीनत्वें काया अविरत इथें त्वां झिजविली ॥
अतीव प्रक्षीणा बनलि तुलसी-काष्ठसम ती ।
मती त्वत्संसारीं परि सतत झाली विहरती ॥ ११ ॥
जरी गेहीं कोंडा, तरि करिसि मांडा मधुर-सा ।
अम्ही होतों प्याया टपत तव मायामधु-रसा ॥

१ अग्निज्वाळेप्रमाणें चटका लावणारा

२ परब्रह्मीं

३ मातृदेवो भव ॥

४ जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ॥

५ वंदे मातरम् !

स्वतां मत्तातातें अनुसरसि[1] तेव्हां सहमता ।
अतां त्याच्या पश्चात् गमन करिसी तद्गति-रता ? ॥ १२ ॥

(सुमंदारमाला)
शिशुत्वींच 'आक्का' परी सासरीं गे, तुला नाम 'भागीरथी' लाभलें ।
नदी त्वत्सखी भाविकां जेविं देई, दिलें क्षेम तूंही अम्हांला भलें ॥
जरेमाजि गं[2]भा पणों तीच ग[3]भा, तुला क्षेत्र का[4]शीमधें पावली ।
अतां भेटि आकाशगंगेस घाया, द्युलो[5]कांत गेलीस का माउली ? ॥ १३ ॥

× × ×

(शिखरिणी) जगीं[6] जन्मा आला, मरण मग त्याला न टळत ।
जँरी स्वर्गीं जाई तरि जगतिं येई न कळत ॥
खँरा तोचि प्राणी स्वकुल वरि आणी निजबलें ।
स्ववर्शी तूं धन्या, तुजसदृश अन्या न जमलें ॥ १४ ॥

× × ×

(गीति) रचिलीं[9] विलापिका हे, तव तनु रचिल्या चितेकडे नेली ॥
ज्येष्ठचिरंजीवानें कीर्ति चिरंजीविनी तुझी केली ॥ १५ ॥

रचना ता॥ ३-७-१९४५

१ यस्य भार्या शुचिर्दक्षा भर्तार अनुगामिनी
नित्य मधुरवक्त्रीच सा रमा न रमा रमा ॥

भावार्थ—आई, तुझे यजमान (आमचे वडिल) जीवत असता त्यांच्या म्हणण्याप्रमाणें तू वागत होतीस;आतां त्यांच्या निधनानतरहि त्यांच्या गतीला अनुसरून तू गमन केलेंस कीं काय ?

२ ग. भा पणों—वैधव्यावस्थेंत
३ ग. भा — गगाभागीरथी नदी
४ तू काशीयात्रेस गेलीस तेव्हा.
५ द्युलोकांत—स्वर्गांत

६ जातस्यहि ध्रुवो मृत्यु
७ ध्रुव जन्म मृतस्यच ॥
८ स जातो येन जातेन
याति वश समुन्नतिम् ।

९ ज्यानें चिता रचिली,त्याच तुझ्या ज्येष्ठ चिरजीवानें ही विलापिकाहि रचिली ! परतु या दोन कृत्यांत इतका तीव्र भेद कीं, चितेवरील तुझी तनु अल्पावकाशात इहलोक सोडून गेली असली, तरी तुझ्या ज्येष्ठ चिरजीवानें या विलापिकेच्या द्वारें तुझी कीर्ति अमर केली आहे

# मृत्यूस आवाहन

( जीवितयात्रा सफल झालेल्याचे उद्गार )—

( चाल—बहु असोत सुंदर० )

अजुनि कां न येइ मला हो निमन्त्रण ? ।
ईशिराचें न कळे मज काय कारण ॥ ध्रु० ॥

चालति चिरकाल तेथ हो प्रयोजनें
जन येती उल्लंघुनि अमित योजनें
दुर्विधि त्यां मंडपात रोजरोज ने
काळगृहीं झडति अशीं लक्षभोजनें
सतत हें चालतसे जीवमारण ॥ अजुनि कां न येइ ० ॥ १ ॥

आजवरी इष्टमित्र-आप्तगण किती
आकर्षुनि नेले हो त्यांस नच मिति
आहूतहि मग त्यांच्या होति आहुती
उरलों मी अजुनि कसा हाय ! मागुती ?
राहवे न येथ मला एकही क्षण ॥ अजुनि कां न येइ ० ॥ २ ॥

मम कलत्रपुत्रपौत्र-मित्रजन भले
संसारीं सद्भाग्यें मजसि लाभले
परसुखांत निजसुख मीं नित्य पाहिलें
कर्तव्य न जीवनात अन्य राहिलें
ईशपदीं मम अतां असति ईक्षण ॥ अजुनि कां न येइ० ॥ ३ ॥

वातपात-अपघातहि विविध जातिचे
व्यसनें, आजार-रोग बहुत रीतिचे
परदर्शित-परमादर कपटनीतिचे
जीवनपथिं रिपु हे स्थित असति भीतिचे
यांपासुनि केलें म्यां स्वतनु-रक्षण ॥ अजुनि कां न येइ० ॥ ४ ॥

जीवाचा ध्येयध्रुव काल्पनिक असे
जन्ममरण-फेऱ्यांनी नच कुणा दिसे
प्रतिजन्मीं तन्मार्गीं जीव अडतसे
प्रापंचिक घोर दरीमाजि पडतसे
प्रगति रुद्ध, चक्षुपुढें तिमिर भीषण ॥ अजुनि कां न येइ० ॥ ५ ॥
" मी मी मी " म्हणुनि सदा जीव धडपडे
अधिकाधिक मायामय-बंधनीं पडे
भृंगासम जजाळीं सतत सांपडे
मुक्तिमार्ग नच गवसे, अंतरीं दडे
हो हताश, भोगितसे दुःख दारुण ॥ अजुनि कां न येइ० ॥ ६ ॥
आऽहाऽहा ! हे मृत्यो ! त्वरित येइं रे
तव पाशीं भवपाशांतूनि नेइं रे
जेविं धुकें रविकिरणीं सर्वथा विरे
प्राणदीप्ति निर्वाणीं तेविं जावि रे
तू बलिष्ठ सकलांवर तव नियन्त्रण ॥ अजुनि कां न येइ० ॥ ७ ॥
मम सेवा-शुश्रूषा आजवर जिहीं
केली अन् दाखविली प्रेमभक्तिही
स्मरुनि त्यांस करतों मी नम्र विनति ही
" स्मृति माझी ठेवा हो ! नित्य सग्रहीं "
काळ–करीं करणार प्राण अर्पण ॥ × × ×
आलें हो मज आलें क्षणिं निमंत्रण
उशिराचें उरलें नच कांहिं कारण ॥ ॥ ८ ॥
ॐ शांतिः शांतिः शांतिः

रचना ता॥ १२–८–१९४६

# सांगली-हायस्कुल-वर्णन

[ यांतील प्रत्येक चरणातील आरंभींचीं जाड ठशातील अक्षरें घेतलीं म्हणजे कवितेचें नाव होतें. ]

( वृत्त-मयूरगीति )

सांप्रत मान्य असे ही सुपर्णविजितोच्चशिखरिणी शाला ॥
गमतें कीं ही विद्या-दान करायास बैसली महिला ॥ १ ॥
लीन सदा सद्विद्या-मधु-पानीं शिष्य जेविं मधमाशी ॥
हाव प्रबल बलानें विद्येनें मिळविण्यास कीर्ति-शशी ॥ २ ॥
यशःसुहारें शोभे ज्योत्स्नेनें विधु जसा तशी शाळा ॥
सलिलांत तैल-बिंदू पसरे यश त्यापरी दशदिशांला ॥ ३ ॥
कुरंग-से हो रंगति गायन-वर्गांत शिष्यगण गानें ॥
लतिकेव वळविती गुरु शिष्यांचीं सत्पथासि मृदुलमनें ॥ ४ ॥
वर्ण जिचा दुग्धैव श्वेतहि यश धवल जेविं विधुकांत ॥
नक्षत्रीं विधु शोभे, ही शाळा तेविं इतर शाळेंत ॥ ५ ॥

रचना ता ॥ २-३-१९२४

१ प्रत्येक मधमाशीप्रमाणें प्रत्येक शिष्य विद्यामधुसंचयाचे कामीं मग्न असतो.

# इंग्रजी कवितेचें भाषांतर

( वृत्त—पृथ्वी )

करी रण, चिरी अरी, परि पळे दुरी लौकरी ।
दुजा दिनिं तयास हो, मिळतसे लढाया तरी ॥
परी समरिं जाउनी, लढुनिया मरे जो युधीं ।
शके न उठण्यास वा रण करावयाला कधीं ॥ १ ॥

( मूळ इंग्रजी कविता–Indian King Reader IV page 107 वर आहे ती अशीः—)

He who fights and runs away
May live to fight for another day
But he who is in battle slain
Can never rise and fight again

# पाऊस पडतांना पाहून

( वर्ग चालू असताना खालील कविता एकदम सुचली आहे )

( वृत्त—मालिनी )

जलद बहुकृपेनें वर्षतो जीवनातें ।
सकल भरुनि गेलीं वारिनें पूर्ण शेतें ॥
सळसळ जलधारा येति शब्दा करीत ।
बघुनि मुदित होती छात्र विद्यालयांत ॥ १ ॥

रचना ता ॥ १४-७-१९२५

६०९०

# श्रीसहकारी-देवी

( सहकारी चळवळीला उद्देशून रचलेल्या कविता )

( वृत्त—शार्दूलविक्रीडित )

दीनांची अनुकंपनीय कुदशा पाहोनियां भूतलीं ।
त्यांच्या अभ्युदयार्थ जी लगबगां स्वर्गांतुनी पातली ॥
सौख्याची सरिताच केवळ गमे सर्वांस जी सर्वदा ।
भक्तीनें अभिवंदितों सतत मी त्या देवतेच्या पदा ॥ १॥

कृष्णाचा कर धैर्य देत असतां गोवर्धनाखालतीं ।
गोपांना सुख लाभलें, बहुमुदें आल्हादली भारती ॥
साहाय्यार्थ सदैव सिद्ध असतां या देवतेचा कर ।
दुःखाच्या गिरिखालिंही सुख न कां दीनांस व्हावें तर? ॥२॥

रचना ता॥ २६-८-१९२७

# दिवाकर-गौरव

( मुंबई येथें पूर्वी काहीं काल निघणाऱ्या दिवाकर मासिकास उद्देशून )

( वृत्त—शार्दूलविक्रीडित )

जैसा दीप्त दिवाकर प्रकटतां प्राची दिशेच्या मुशीं ।
तन्नामात्मक मासिक प्रसवतां मुंबापुरीच्या कुशीं ॥
नानालेखक-भाटवर्ग जमुनी गाणीं म्हणों लागती ।
'व्हा जागे जन हो ! निजोद्यम करा' ऐसें तयां सांगती ॥ १ ॥

हें औद्योगिक नव्यलेखनकथाद्वारें मनोरंजन ।
लोकांचें करितां, विलेपन करो नेत्रांत बोधांजन ॥
व्यापारोद्यमजागृती ठरवुनी ऐसें नवें धोरण ।
होवो उन्नतिमंडपास अपुल्या भव्याकृती तोरण ॥ २ ॥

रचना ता ॥ १७-९-१९३०

प्रसिद्धि दिवाकर मासिक अंक १ : ऑक्टोबर १९३०

# अन्नदेवतेस नमन !

( 'अन्नंभट' या अप्रकाशित विनोदी नाटिकेंतील कटाव )

( चाल—कटावाची )

धन्यधन्य गे ! अन्नदेवते ! । जगन्नायिके ! नमो नमस्ते ।
तवाधीन गे ! सर्व देव ते । स्मरति नित्य तुज लोक जेवते ।
स्निग्ध देह तव जशी खव्याची । बर्फी किंवा ढेप गुळाची ।
खुसखुशीत वडि आंबरसाची । किंवा पोळी बक्षिगव्हाची ।
वर्ण तुझा त्या श्रीखंडाचा । गाभा अनुपम लावण्याचा ।
शोभा दे त्या रंग कढीचा । तसाच पिवळा तव शालूचा ।
चक्र वेणिचें शिरिं वाटोळें । लांब शेवयाचें वेटाळें ।
गोल कुरडयांचें कीं जाळें । नेत्र जसें तें शंकरपाळें ।
मोदकापरी वदन शोभतें । टोंक तयाचें तुझें नाक तें ।
फुगीर गालीं पुरी फुगटते । कर्णस्थानीं करंजी बसते ।
लाडू जैसे मोतिचुराचे । कीं बुंदीचे छान कळीचे ।
कुचमंडळ तव शोभे साचें । सदा 'हस्तगत' करावयाचें ।
ऐसें सुंदर रूप मनोहर । वर्णवेच ना मला खरोखर ।
प्रणाम माझा घे तूं तें । धन्यधन्य गे ! अन्नदेवते !० ॥

रचना ता ॥

# श्रीमन्मयूर-प्रशस्ति

[ महाराष्ट्रकविवर्य आर्यापति श्रीमोरोपंत यांच्या कवितांच्या अगाध भांडारातून अनुरूप चरण व कल्पना वेचून घेऊन त्यांच्याच आधारावर खालील गौरवपर कविता रचिल्या आहेत, तथापि पंतांच्याच चिरस्मरणीय शब्दांत सांगावयाचें तर–" स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ? " हेंच खरें. मु पुणें येथें चैत्र शु॥ १५ शके १८५५ पंतपुण्यतिथीस 'पंताची वाङ्मयमूर्ति हा निबंध वाचला, तेंव्हा खालील कविता म्हणून दाखविल्या ]

'आर्यामुक्तामाला' दाविन परि जरि तुम्ही न मागाल ॥
लागाल प्रभुकंठीं घालूं फुगवील कीं रमा गाल ॥ १ ॥

असें म्हणुनि माळ ती तवमन'समुद्रोद्भवा–।
सुताकरिंहि देउनी तिजसि अर्पिलें माधवा ॥
न कां मग रमा, धवासह दुजी प्रिया पाहुनी ।
कपोल फुगवील ती सवत आपुली मानुनी ! ॥ २ ॥

झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु, परंतु तुलनेतें ॥
तुजसम तूं, हें त्वद्यश " कविवर्य–" पदीं तुला अतुल नेतें ॥ ३ ॥
ग्रंथसुता आधीं, मग वंदीन मयूरकवि विशालमति ॥
शिववंदनेच्छु आधीं विद्यानिधि तत्सुता जसे नमिती ॥ ४ ॥
रसिककवी तव काव्यें अनेकविध पाहुनी न कां रंजे ? ॥
वाटे त्वत्प्रतिभेचें झरझरतें नव्यभव्य कारंजें ॥ ५ ॥
आर्या आर्यांस रूचे, ज्यां न रूचे ते अनार्य हो खचित ॥
त्यांस कशा समजाव्या प्रमदालीला सुवर्ण-नग खचित ? ॥ ६ ॥
तूंच खरा आर्यापति, यथेच्छ तूं शारदेस वाहविलें ॥
इतर अनार्यापति कवि, कीं ते भलतीकडेच वाहवले ॥ ७ ॥
यास्तव किंतिदां प्रणती करितों याची नसे मुळीं गणती ॥
गुणगणकण अणु कथितां, घेती मानूनि सुज्ञजनगण ती ॥ ८ ॥

रचना—रामनवमी शके १८५५
ता॥ ४–४–१९३३
प्रसिद्धि पुरुषार्थमासिक जुलै व ऑगस्ट १९३३

# यशश्चिंतन

( वृत्त–शार्दूलविक्रीडित )

विद्याधीश गणेश, माधव जया पद्मालया भामिनी ।
श्रीसत्येश्वर वेळणेश्वर, तशी जोगेश्वरी स्वामिनी ॥
भास्वान् विघ्नतिमिस्र–हा शुभकर श्रीमान् जगन्नायक ।
वर्षो मंगलदायिनी वसुधा हें देवता–पंचक ॥ १ ॥
आराधूनि तपें तपस्वि–सुजनीं केलीं महापावनें ।
विस्तीर्णें गिरिगव्हरें सुखद जीं स्रोतांचिया धावनें ॥
उत्तुंगाद्रि-शिरें जिथें वसतसे प्रत्यक्ष तो शर्वही ।
दांपत्यास करोत दान सुकृतक्षेमादिकें सर्व हीं ॥ २ ॥
षट्शास्त्रें, श्रुतिसंहिता विविध त्या, पोथ्यापुराणें तशीं ।
यांतील प्रतिशब्द दानचि करो आशीर्वचें भव्यशीं ॥
जें जें मंगल या समस्त वसुधा-पृष्ठावरी नांदतें ।
तें तें प्रेमगुणें वधूवर–मनां हो शाश्वती सांधतें ॥ ३ ॥
वाद्यें मंजुल वाजती, ध्वनि तीं स्वर्दुंदुभी लाजती ।
नारीसंघ विराजती, जन तसे या मंडपीं साजती ॥
विप्रांचें "शुभ सावधान" म्हणणें देवांसही तर्पितें ।
वेला मंगल पाहुनी प्रियवरा माला वधू अर्पिते ॥ ४ ॥
ज्याचा कीर्तिसुगंध धुंद बनवी दाही दिशांचे इभ ।
धी–गीः–श्री–युत 'साठये'-कुलज तो आहे तुझा वल्लभ ॥
तो 'नारायण' मूर्त तूहि असशी प्रत्यक्ष लक्ष्मीपरी ।
"यावत् चंद्रदिवाकरौ" सुखभरें नांदा सदा भूवरी ॥ ५ ॥

सेवाधर्मपरायणा कमलजा नारायणा आदरी ।
किंवा वीरमणी शिवास रमणी ती पार्वती सुंदरी ॥
तैशी देउनि तू स्वसे ! तव वरा सर्वस्व, सेवा कर ।
अन्योन्यां प्रिय व्हा, निरंतर सुखी राखो तुम्हां शंकर ॥ ६ ॥
कन्या ही धनराशि द्यायचि असे अन्यास जी यौवनीं ।
ही होता स्मृति दु:ख-हर्ष-लहरी हेलावती मन्मनीं ॥
हा सृष्टिक्रम योग्य यास्तव चिठे ! मी हें तुला सांगतों ।
तद्वंशा ध्वज हो, स्वधर्मरत हो, पाळीं यथासांग तो ॥ ७ ॥
होता ब्राह्म-विवाह-सद्विधि सुरू होतो गृहस्थाश्रम ।
त्यातें आचरितां तुम्ही उभयतां पावूं नका संभ्रम ॥
मांगल्यप्रद चार अर्थ मिळवा, साफल्य जें भूवरी ।
ठेवा भाव हरीवरीच पुरता, जो भाविकां सांवरी ॥ ८ ॥

( वृत्त–शिखरिणी )

वधू साक्षाल्लक्ष्मी, वरहि मग नारायण खरा ।
तुम्ही लक्ष्मीनारायण–सम सुखीं नित्य विहरा ॥
करा देशोद्धारा निवडुनि तयाची भवनति ।
तुम्हां दोघां ' दामो–दर ' करित हा हीच विनति ॥ ॐ ॥

× × ×

जोशीवंशोद्भवेनेदं श्रीविनायकसूनुना ॥
दामोदरेण रचितं यशश्चितनमीदृशम् ॥

**विवाहदिन–**

ज्येष्ठ शु॥ १२ शके १८५४

ता॥ १५–६–१९३२

# मंगळागौर

( चाल-झिम्म्याची )

मंगळागौर । माझी मंगळागौर
भक्तिभावें पूजूनिया जोडूं या कर ॥
पानपत्री नानारीति
आणूं वाहूं देवीप्रति
वशेळ्यांच्या सगें प्रार्थूं । देवी सुंदर ॥
रूपशक्तिमती देवी
सौख्यामाजी सर्वां ठेवी
जन्मोजन्मीं सौभाग्याचा । देवो ती वर ॥
देवी पाहोनी मंगला
जीव आमुचा रंगला
इच्छामात्रें तीच्या वाहो । कृपेचा पूर ॥
सौख्यसोहळा पाहोनी
राहे नजर गुंगोनी
जागवाया रात्रभर । होऊं तयार ॥
छप्पापाणी-फुगड्या-गोफ
झिम्मा खेळूं, नाचूं खूप
सासूसासऱ्यांचा धाक । सारूनी दूर ॥

रचना ता॥ १५-८-१९३३

प्रसिद्धि स्त्रीमासिक : ऑगस्ट १९३४

# मौंजीबंधन

[ कु. यशवंत देव याच्या व्रतबंधानिमित्त रचलेलें. मनात आल्यापासून सुमारें सहा तासात खालील पद्यें अवतीर्ण झालीं आहेत ]

( वृत्त—शार्दूलविक्रीडित )

उत्साहें भरली समस्त वसुधा नेत्रोत्सवा शोभली ।
नक्षत्रग्रहतारकाबलयुता वेळा भली लाभली ॥
आकाशीं रवि थांबला सकुतुकें माथा मुदें हालला ।
ऐसा थोर विधी सुमंगलदिनीं ‘ देवां ’–कडे चालला ॥ १ ॥

शोभे मंडप थाटला, मृदुलतापर्णादिकीं दाटला ।
सर्वां दृश्यचि वाटला, म्हणुनिया समर्द हा रेटला ॥
भक्ता देवचि भेटला, जणुं गमे चिंतोदधी आटला ।
उत्साहा भर लोटला, जनमनीं आनंद कोंदाटला ॥ २ ॥

नामें तू ‘ यशवंत देव ’ असशी भूदेव[1] व्हावें खरा ।
मौंजीबंधन हा सुमंगल असा संस्कार होई बरा ॥
तेजःक्षांतिपरा वसिष्ठमुनिची व्हावी तुझी वैखरी ।
वाल्मीक्याऽत्रिमुनींपरी त्रिजगतीं स्वत्कीर्ति होवो खरी ॥ ३ ॥

धर्माची अवहेलना बहुपरी होई पहा संप्रति ।
जो दीनोद्धरणीं समर्थचि परि त्राता नसे त्याप्रति ॥
जो[2] धर्मप्रतिपालनीं क्षम तया सद्धर्म रक्षी स्वयें ।
त्याया त्याग्यपथीं जनां स्वकृतिनें आदर्श हो निश्चयें ॥ ४ ॥

१ ब्राह्मण

२ धर्मो रक्षति रक्षित.

ज्याचीं तीनच पावलें परि कसें त्रैलोक्य सामावलें !।
तैसें त्वद्यश वामनापरि बटो ! राहो त्रिखंडीं भलें ॥
निष्ठावान् असणे ध्रुवापरि जगीं हा बोध चित्तीं ठसो ।
विश्वस्तुल्यजनीं सदा ध्रुपदसें त्वन्नाम आधीं वसो ॥ ५ ॥
'संस्कारैः[1] द्विज उच्यते' जननिं ज्या 'शूद्रत्व सजायते'।
षट्कर्मोचित सद्गुणां मिळवुनी होईं यशस्वी यतें ॥
वाढो धी.श्रुति शक्तियुक्तिसहिता शुक्लेंदुवत् सत्वरें ।
वंशाची निज आर्यभूजननिची हो उन्नति त्वत्करें ॥ ६ ॥

वना-चैत्र व॥ २ शके १८५६
ता॥ १-४-१९३४

१ जन्मना जायते शूद्रः संस्कारैः द्विज उच्यते ॥

# माझा बोका

[ वृत्त–शार्दूलविक्रीडित ]

बाल्यापासुनि एक छान 'करडा' बोका अम्हीं पाळिला ।
झाला आवडता अतीव सगळ्या तो आमुच्या चाळिला ॥
त्यानें दाखविले स्वजातिगुणही शेजारच्या आळिला ।
बोका तो प्रिय लाडका कितिकदां त्यां रोज कुर्वाळिला ॥ १ ॥

ज्याचें अंग मऊ, मऊ न गमतें लोणीहि त्याच्याहुनी ।
केसांचें भरघोंस पुच्छ उभवी प्रेमें मला पाहुनी ॥
डोळे शोभति जेविं 'रेडियम'चे कांटे घड्याळांतले ।
अंधारांतहि उंदरा क्षणिं वधी, अत्यंत जे मातले ॥ २ ॥

जावें देवघरांत पूजनविधी भावें कराया यदा ।
यावें तेथवरी कधीं न चुकतां ठावें तया हें सदा ॥
घ्यावे नेत्र मिटून ईशभजनीं व्हावें जणूं तन्मय ।
प्यावें, पूजन संपतां, मटमटां, द्यावें तया जें पय ॥ ३ ॥

सिंहाची पशुमारणीं प्रखरता, कीं आसुरी क्रूरता ।
कोल्ह्याची तशि दाखवी चतुरता, तो उंदरां मारतां ॥
वाघाचा जरि मावसा तरि लळा वाटे तयाचा मला ।
साऱ्या एकवटूनि या गुणकला कीं हा जणों जन्मला ! ॥ ४ ॥

" खाया चोरुनि दूधसाय तुमचा बोकाचि सोकावला ।
त्याचा गुंडपणा बघूनि अमुचा हा जीव हो कावला " ॥
गाऱ्हाणीं कथिती अशीं प्रतिदिनीं सन्त्रस्त शेजारिणी ।
मारी उंदिर त्यांकडील म्हणुनी तो घे जणूं खंडणी ! ॥ ५ ॥

'शंभ्या, शुंभ, मन्या, गण्या' अशि किती तत्प्रेमनामावली ।
नामें अन्यहि मीं अनन्यममता-योगें तया ठेवलीं ॥
आम्ही प्रेम अखंड नित्य करितों जें एकमेकांवरी ।
तैसें पुत्रकलत्रमित्र न कधीं स्वप्रेमलोकीं करी ॥ ६ ॥

कांपे मूषक-मंडळी थरथरां तो त्यां गमे काळ-सा ।
शेजाऱ्यांसहि दांडगेश्वर दिसे तो क्रूर विक्राळ-सा ॥
मोठा प्रेमळ मित्र-साच परि तो वाटे अम्हांला भला ।
होता पूर्व-ऋणानुबंध म्हणुनी दैवें अम्हां लाभला ॥ ७ ॥

× × ×

हायहाय ! परी ऐका, वार्ता जी तीव्र ताप–दा ॥
नेला चोरूनि तो बोका, दुष्टें, ही घोर आपदा ॥

रचना ता॥२९–११–१९३५

# नवरत्नहार

( वृत्त-शार्दूलविक्रीडित )

श्रीगौरीहर-वेळणेश्वर-कुलस्वामी मृडानीपतिः ।
संसाराब्धितितीर्षुतारणपरा जोगेश्वरी स्वामिनी ॥
दुःखध्वांतदिवाकरः गणपतिः पद्माविलासास्पद. ।
श्रीपंचायतनं ददातु सुवरान् नव्यौ वधूवल्लभौ ॥ १ ॥

गायत्री सुरकामधेनु करिते भक्तस्पृहापोषण ।
गंगा स्मर्तृजनांस मंगलवरें दे नित्य संतोषण ॥
गीता सत्कृति सांगते मथुनि किंकर्तव्यता-दुश्चित ।
ॐ कारात्म ग-कार तीन करिती कल्याण हें निश्चित ॥ २ ॥

कोण्या एक सरोवरीं कमलिनी भाग्योदयें जन्मली ।
प्रौढत्वीं मकरंद-पूर्ण-भरिता झाली भली शोभली ॥
तों आला रवि, रजवी अलिकुलां, तीतें नवी दे द्युति ।
भालेष्टांस तशी सुखावह गमो या दंपतीची युति ॥ ३ ॥

नांवानें वर जो '⏑– ⏑⏑' कृती '– –' वधू त्याप्रति ।
'– –' आणि '⏑– ⏑–' कुलयुती ही धन्य हो शाश्वतीं ॥
ही अभ्यागतमंडळी सुखमती आशीर्वचें वर्षती ।
त्यांना साथचि द्यावयास्तव किती वाद्येंहि संघर्षती ॥ ४ ॥

बाले ! या समयीं तुला कथितसें तें त्वां करावें श्रुत ।
त्यायोगें तव भावि आयु सुतराम् होईल सर्वोदित ॥
जाई आश्रय लाभतां मृदुलता वृक्षाचिया शेखरीं ।
तैशी स्वत्पतिसंगमीं तवतनूवल्ली भरारो खरी ॥ ५ ॥

बाले ! स्वजननीं त्वदीय जननीतातादि संमोहले ।
बाळत्वीं तव हास्यलास्य बघुनी सौख्यार्णवीं पोहले ॥
देतां भर्तृकरीं मुली ! तुज अतां तन्नेत्र ओलावले ।
त्यांचे हे श्रम पाहिजेतचि मुली ! तूं सार्थकीं लावले ॥ ६ ॥

आतां सत्यचि आजपासुनि मुली ! आलीस अस्मत्कुलीं ।
ठेवावी बहु सुप्रसन्नचि सदा तूं मंडळी येथली ॥
दोंबाजूंसहि देहलीवरुनियां[1] दीपप्रभा जातसे ।
सद्भाग्यें तव तातवल्लभकुलां त्वां भूषवावें तसें ॥ ७ ॥

श्रीरामेश्वर-मानसा बहु रुचे गंगानदी-कावडी ।
त्वद्वाणीश्रवणीं त्वदीय पतिला वाटो तशी आवडी ॥
तच्चित्तीं तव मूर्ति संतत रमो जैशी नभीं बावडी ।
तूतें तत्सुखहेतु ती कृति गमो गोडी, न हो वावडी ॥ ८ ॥

साधाया पुरुषार्थ चार बरवा वाटे गृहस्थाश्रम ।
होती सार्थचि यात जीवितयश.सिद्ध्यर्थदीर्घश्रम ॥
तद्दीक्षा वरिली तुम्हीं उभयतां संसार आतां करा ।
संपत्संततिसौख्यदा प्रभुवरा भावें भजा श्रीकरा ॥ ९ ॥

**विवाह** ता॥ २९-५-१९३७

१ उंबरठा ( देहलीदीपकन्याय )

# आमचा रामा गडी

( चाल–लावणीची )

हुशार रामा गडी आमुचा अम्हांकडे नोकरी । इमानें इतबारें तो करी ॥ ध्रु०॥

थेट कोंकणांतुनी भा[1]उच्या उतरे धक्क्या[1]वरी । थक्क हो पाहुनि मुंबापुरी ॥

देह चिप्यासम, वर्ण काळसर-तांबुस मातीपरी । कातळाचीच पाडिला सरी ॥

नाकामधुनी ओबडधोबड भाषा बोले जरी । आंतुनी फणसासम ती खरी ॥

तीं जांब-जांभळें, आपुस वा पायरी

रसयुक्त फळें हीं देती बहु माधुरी

तशि भाषा त्याची रसाळ हो अंतरीं

जेवुनि-खाउनि, चैनीसाठीं पगार खेळे करीं ।'मुंबई जीवाची'तो करी ॥ध्रु०॥१॥

विजार लांडी, गंजीफ्रॉकहि साधा-सा वापरी । कधिं करी ऐटहि नानापरी ॥

दिनभर राबे, परी सणाला कधीं न दे हाजिरी । आपली हौस करी साजिरी ॥

गोकुळकाला, गणपति–गौरी, शिमगा–धुळवड पुरी । दाखवी रीत जनां नाचरी॥

"गोविंदा आला, आला तुमच्या घरीं

दहिंदूध खूपसें ओता त्याच्यावरी"

धरि फेर सख्यांसह, अशी गर्जना करी

कष्टाळू अति, जात इमानी दुजी न भूमीवरी । धन्याची धन्य करी चाकरी ॥ध्रु॥

अमुचीं संभाळुनियां प्रेमें कामें दुसऱ्या घरीं । कमाईकरितां जादा करी ॥

मर्जी राखुनि, सेवा करितो शेठाची बहुपरी । खूष 'लई' शेठाणी त्यावरी ॥

आडोशाला बसुनी करितां जेवण वा न्याहरी । आठवी घरची स्थिति अंतरीं ॥

म्हणुनियां पगार पडतां करीं

कोंकणांत आधीं द्रव्य रवाना करी

क्रम अचूक ऐसा प्रतिमासीं आचरी

जणू मुंबईच्या तो आणिक त्याच्या जीवावरी । जन्मभर जगती सारीं वरीं ॥

ध्रु० ॥३॥

रचना ता॥–४–४–१९४६

१ भाऊचा धक्का–कोंकणातील बोटी लागण्याचें व सुटण्याचें मुंबई येथील ठिकाण

# ‘रामदास’ बोटीची जलसमाधि !

( ता. १७।७।४७ रोजीं आषाढी अमावास्येचे दिवशीं रेवस बंदराला जाण्यासाठीं निघालेली ‘रामदास’ बोट मुंबईपासून १२।१३ मैलावर काश्याच्या खडकाजवळ समुद्रात बुडाली, ह्या शोकप्रद प्रसंग खालील कवितेंत वर्णिला आहे. रौद्ररसातील कविता छापून झाल्यानंतर ही दुर्दैवी घटना घडल्यामुळें ही कविता येथें दिली आहे )

[ चाल–उद्धवा, शांतवन कर जा० ]

नरबुद्धिभावना रडली । दुर्दैवी घटना घडली ॥ ध्रु० ॥
आषाढ-अमावास्येला । दुष्टयोग जमुनी आला ॥
पाऊस, वादळी वारा । दर्याहि तुफानी झाला ॥
‘रामदास’ बोटीमध्यें । गर्दीचा लोंढा घुसला ॥
सोडतां ‘ भाउचा धक्का ’
सर्वांच्या हृदयीं धक्का
बसला, तो झाला पक्का
डळमळली, भाशा मेली । दुर्दैवी घटना घडली ॥ १ ॥
घेउनी उतारू सगें । सातशेंहुनी हो ! जास्ती ॥
चालली बोट नेटानें । दर्या जरि दावी मस्ती ॥
उत्तुंग उसळल्या लाटा । उपजविती चित्तीं धास्ती ॥
लाटा न, नागिणी अपुल्या
लालचलेल्या त्या जिभल्या
बाहेर काढुनी आल्या
धडकीनें सारीं भ्यालीं । दुर्दैवी घटना घडली ॥ २ ॥

सोसाट पिसाटे वारा । चवताळुनि आला तडक ॥
खळ खळ खळ काळें पाणी । फेसाळुनि मारी थडक ॥
खात खात झोंके आली । 'काश्याचा' जेथें 'खडक' ॥

तों धावुनि आला काळ
ओकीत विषारी लाळ
जनहृदयीं हलकल्लोळ

शेवटची घटिका भरली । दुर्दैवी घटना घडली ॥ ३ ॥
एक लाट इकडुनि आली । तों बोटच तिकडे कलली ॥
बायकामुलें भेदरलीं । मरणवेळ सर्वां कळली ॥
किंचाळुनि छाती फुटली । गडबड नि रडारड झाली ॥

जीवाशा अवचित दडली
बंधनें मृत्युचीं जडलीं
मग बोट कुशीवर पडली

क्षणिं रसातळाला गेली ! । दुर्दैवी घटना घडली ॥ ४ ॥

रचना ता. २४–७–४७

# मन्मनोरथमाला

( वृत्त–औपच्छंदसिक )

[ या वृत्ताचें लक्षण–१ व ३ या चरणात **ससज द्विगुरू** हे गण आणि २ व ४ या चरणात **सभरय** हे गण असें आहे कविश्रेष्ठ मोरोपत यांनीं या वृत्तात **"आशंसाष्टक"** रचिलें आहे. ]

मज हें दिसे सुभाग्य मोठें । कविमालेंतिल पुष्पपत्र व्हावें ॥
जगदुद्धरिणी सरस्वतीच्या । शुभकंठाऽऽभरणीं सदा रहावें ॥ १ ॥

नवरत्नततीं मिळा सु-सोन्या । तरि सामान्य 'खडा' तिथें वसावा ॥
करि धारण नित्य शालजोडी । तिजला पायघडी गमो विसावा ॥ २ ॥

विलसे सविता नभीं स्वतेजें । ग्रह संगें असती पर[1] प्रकाशी ॥
कवि गीष्पति थोर, तेथ राहो । जन हा मंदमतीहि त्यांजपाशीं ॥ ३ ॥

गिरिच्या शिरिं उंचउंच जावें । अथवा अब्धितटीं सुखें रमावें ॥
गगनीं द्युतिगोलकां पहावें । सकलाधारमहेश्वरा नमावें ॥ ४ ॥

करितां प्रतिभाप्रसाधनातें । मम चित्तवृत्ति न लेशही शिणाव्या ॥
कविवर्यमयूर–काव्यपंक्ति । प्रिय केकावलि सारख्या म्हणाव्या ॥ ५ ॥

विजनीं, सुजनीं, वनीं, मनींही । करुनी गुंजन कीं बहूच घोष ॥
कविता मम वा दुजाहि गातां । मज लाभो चिरकाल आत्मतोष ॥ ६ ॥

रचना ता॥ २०–३–४६

१ वास्तविक ग्रह हे सूर्यप्रकाशीच आहेत

# मेरुमणि

( वृत्त- शार्दूलविक्रीडित )

नानालोक-कथानुभूति-निकर्षी सत्-रूप जें रेखिलें ।
विश्वीं शाश्वत चेतनामय असें चित्-रूप जें देखिलें ॥
तत्संगोत्थित- मुद्-स्वरूप-कविता[1] तेजस्विता पावली ।
ही सर्वांस रुचो त्रिरूप[2] गुणिता " आमोद-रत्नावलि " ॥

रचना ता॥१३-५-१९४५

## विद्वज्जन-प्रार्थना

( वृत्त-शार्दूलविक्रीडित )

येथें जें पडलें उणें- अधिक तें विद्वज्जनीं साहिजे ।
प्रेमें पूर्ण कृपा करोनि बरवें केलें तिहीं पाहिजे ॥
जे जे थोर परोपकार-रत त्यां हें योग्य आहे सदा ।
त्यांचा तो उपकार फारच अम्ही मानू सदासर्वदा ॥

— : श्रीमोरोपंतभक्त परशुरामतात्या गोडबोले

कोठें दूरान्वितपद, कोठें चुकली असेल यतिमात्र ॥
' अतिमात्र दोष ' ऐसें न वदोत कवी समस्तगुणपात्र ॥

— श्रीमोरोपंत मन्त्ररामायण-उपोद्घात

ग्रंथ ... ६५६० ... क्र. ६६१०

१ सत् व चित् याच्या संयोगापासून उत्पन्न झालेली मुद् ( आनंद-आमोद ) स्वरूपिणी अशी कविता

२ सच्चिदानंद या त्रिरूपात्मक गुणानीं युक्ता ( दोन्यानें गुफलेली ) अशी




# AERIALEX

Rs. 10-8-0 + Postage Re 1/-

**AERIALEX** reduces noise level—eliminates risks due to lightning, rain, storm etc.—improves quality when connected in series to an outdoor aerial.

No poles, masts, hanging wires—of the size of a door-bell. AERIALEX can be fitted on your Radio too.

## RADIO ELECTRIC LTD.

**Lamington Chambers, BOMBAY 4**

# दम्यांतून मुक्त ! !

# एलिक्सिर एफेलिन



हें एक दम्यावरील अति उत्कृष्ट औषध आहे.

सर्वत्र मिळतें.

४ औंस बाटली किं. २-१०.०. १६ औंस बा. १० रु.

## इंडो-कॉन्टिनेन्टल ट्रेडिंग कंपनी

४५७ सँढर्स्ट रोड, मुंबई ४

# रामतीर्थ ब्राह्मी तेल

[ स्पेशल नं १ ] (रजिस्टर्ड)



मेंदूचे ज्ञानतंतु बलवान् होऊन सफेत केस काळे होतात टक्कल पडलेल्या ठिकाणीं केस येतात खवडे नष्ट होतात लिखा व उवा नाश पाव-तात. स्मरणशक्ति आणि दृष्टीची वाढ होऊन गाढ झोप लागते प्रत्येक ऋतूंत स्त्री-पुरुष आणि मुलें यांसाठीं अत्यंत फायदेशीर आहे.

सर्वत्र मिळतें.

मोठी बा. रु ३॥, लहान बा. रु. २.

श्रीरामतीर्थ योगाश्रम, ४४८ सॅण्ढर्स्ट रोड, मुंबई नं ४